Poona D. P. I's No. S/66/B/8-21-9-1928.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. २७६९

शिक्षणमाला—पु. नं. ६.

ध्यप्रांत व वऱ्हाडयेथील शाळाखात्यानें
मंजूर केलेलें.

# निबंध कसे लिहावे?

आवृत्ति २ री.

लेखक

घनश्याम बाळकृष्ण चिपळूणकर
सेवासदन ट्रे. कॉ. पुणें
माजी शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें.

REFBK-0005040

किंमत ६ आणे.

सन १९३४.

Nagpur Order No. 7010, 29-10-1928.

REFBK-0005040
स्थळ प्रत
सं. नि. नं. 223
ता. २-९-१३
५०४०

## लेखकाचे दोन शब्द.

——:o:——

दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना—निबंध कसे लिहावे? हें पुस्तक किंमतीनें लहान पण गुणानें मोठें असें असल्यामुळें त्याची पहिली आवृत्ति लवकरच संपून ही दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग आला आहे. सदर पुस्तक मुंबई इलाखा, मध्यप्रांत व वऱ्हाड येथील शाळाखात्यानें मंजूर केलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे; व त्याबद्दल त्या शाळाखात्यांचा मी फार आभारी आहें.

वाक्यरचना हा निबंधाचा पाया असल्यामुळें बऱ्याच शिक्षकांनीं वाक्यरचना हा विषय ह्या पुस्तकांत घालण्यास सूचना केल्या होत्या, शिवाय ट्रे. कॉलेजमधील मुलांमुलींनाही हा विषय असल्यामुळें ह्या आवृत्तींत आरंभीं १६ पानें जास्त घालून त्यांत वाक्यरचनेबद्दल ...र माहिती देऊन, वाक्यरचनेचे ६ नमुने दिले आहेत.

...ा शुद्धलेखनासंबंधींही मुलांना उपयुक्त असे १० ठळक नियम दिले आ...ा. व त्या नियमासंबंधीं शिक्षकांसही कांहीं महत्त्वाच्या सूचना केल्या आहे्त. त्यांप्रमाणें शिक्षकांनीं अनुभव घेऊन पहावा. ह्या पुस्तकांत वाक्यरचनेचे निरनिराळे ६ नमुने, निरनिराळे २५ निबंध व ५ पत्रें असल्यामुळें मराठी ४–५–६–७ ह्या इयत्तांना व इंग्रजी शाळेंतील १–२–३–४ ह्या इयत्तांना हें पुस्तक फारच उपयोगाचें झालें आहे. जरी १६ पानें मजकूर जास्त घातला आहे तरी पुस्तकाची किंमत वाढविलेली नाहीं; हें लक्षांत आणून शाळांचे चालक व शिक्षक ह्या पुस्तकाला पूर्वीप्रमाणेंच आश्रय देतील अशी आशा आहे. क. लो. हे वि.

**ग. वा. चिपळूणकर.**

## वाक्यरचनांचा क्रम.

—:०:—

| | |
|---|---|
| १ पोपटावरून. | ४ शब्द गाळलेली गोष्ट. |
| २ संक्षेपाचा विस्तार. | ५ कांहीं शब्द देऊन गोष्ट बनविणें. |
| ३ विस्ताराचा संक्षेप. | ६ रुपयाचें आत्मवृत्त. |

## निबंधांचीं नांवें व क्रम.

—:०:—

| | | |
|---|---|---|
| १ गाय. | १० प्रदर्शन. | १९ झांशीची राणी. |
| २ कुत्रा. | ११ मांजरीचा प्रवास | २० गृहशिक्षण. |
| ३ चिमणी. | १२ गणपतीचा उत्सव | २१ स्त्रीशिक्षण. |
| ४ घोडा. | १३ लग्न. | २२ माझें आवडतें झाड. |
| ५ मासा. | १४ दिवाळी. | |
| ६ हत्ती. | १५ पाऊस. | २३ स्वदेशाभिमान |
| ७ नदी. | १६ हळदकुंकू. | २४ ग्रंथसंग्रहालय. |
| ८ पुणें शहर. | १७ शिवाजी. | २५ पानिपतची लढाई |
| ९ आगगाडी. | १८ तुकाराम. | (शिवाय ५ पत्रें.) |

मुद्रक—गणेश काशिनाथ गोखले, मॅनेजिंग डायरेक्टर,
श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, ४९५-४९६ शनवार पेठ, पुणें.

प्रकाशक—घनश्याम बाळकृष्ण चिपळूणकर,
शिक्षक, सेवासदन ट्रे. कॉ. पुणें, नं. २

# वाक्यरचना.

**शिक्षकांस सूचना**—मुलांना स्वतःचे विचार थोडक्यात, व्यवस्थित, स्पष्टपणें आणि शुद्धभाषेंत सांगतां यावे हा **उद्देश वाक्यरचनेचा** असतो. म्हणून सोप्या सोप्या वाक्यरचनेला सुरवात अगदीं खालच्या इयत्तांतच केली पाहिजे. निरनिराळ्या विषयांवर मुलांकडून आरंभीं तोंडानेंच वाक्यरचना करून घ्यावी; व तीच **वाक्यरचना** शाळेंत किंवा घरीं लिहावयास लावावी व ती शिक्षकानें तपासावी, म्हणजे मुलांना लहान लहान **निबंध** लिहिण्याची संवय होते. **वाक्यरचना हा निबंधाचा पाया आहे.** म्हणून ही **वाक्यरचना** पूर्वीं झाली नसल्यास मराठी ४–५ व इंग्रजी १–२–३ ह्या इयत्तांत अवश्य करून घ्यावी.

**फायदे**—१ मुलांचा **लाजाळूपणा** नाहींसा करणें, २ मुलांच्या **कल्पना**शक्तीचा विकास करणें, ३ मुलांचा **शब्दसंग्रह** वाढविणें, ४ मुलांना आपले विचार **शुद्ध** व **पूर्ण** वाक्यांत सांगतां येणें, ५ मुलांना आपल्या बोलण्यांत **संगति** ठेवावयास शिकविणें हे **उद्देश** साध्य होण्याकरितां दृश्य वस्तूंवरूनच वाक्यरचना करून घ्यावयाची असते. म्हणून पुढील विषय वाक्यरचनेकरितां घ्यावे.

१ कोणत्याही पदार्थाचें वर्णन तो पदार्थ पुढें ठेवून करविणें.

२ चित्र पुढें ठेवून त्या चित्राचें वर्णन अगर चित्रांतील प्रसंगाचें वर्णन करून घेणें.

३ बाजाराचें वर्णन.

४ पाहिलेल्या जत्रा, समारंभ ह्यांचें वर्णन करून घेणें.

५ प्रवासवर्णन.

६ लहान गोष्ट वाढवून सांगणें.

७ मोठी गोष्ट लहान करून सांगणें.

| | |
|---|---|
| ८ मोठ्या इमारती, किल्ले ह्यांचें वर्णन करून घेणें.<br>९ पशुपक्षी ह्यांचीं वर्णनें.<br>१० सोपी गोष्ट वाचून दाखवून ती मुलांनीं सांगणें.<br>११ अर्धी गोष्ट सांगून कल्पनेनें पुढची अर्धी गोष्ट मुलांनीं पुरी करणें. | १२ खेळ, बाजार, समारंभ, जत्रा ह्यांची माहिती मुद्दे पाडून सांगावयास लावणें.<br>१३ दिवाळी, दसरा, लग्न, उत्सव ह्यांची माहिती मुद्दे पाडून सांगावयास लावणें.<br>१४ संभाषण करणें. |

ह्याप्रमाणें **वाक्यरचनेचे विषय** निवडतां येतील.

## वाक्यरचना—नमुना १ ला—पोपटावरून.

१ **खरा पोपट** अगर पोपटाचें चित्र वर्गांत टेबलावर ठेवावें व त्याचें **निरीक्षण** मुलांकडून अगोदर करून घ्यावें. २ निरीक्षण केल्यावर शिक्षकानें पोपटासंबंधीं संगतवार जुळणीचे **प्रश्न** विचारावे व मुलांकडून **पूर्ण वाक्यांत उत्तरें** काढून घ्यावीं. ३ व तीं उत्तरें फळ्यावर मुलांस लिहिण्यास सांगावीं किंवा शिक्षकानें लिहावीं. ४ मग संगतवार वर्णन मुलांकडून वाचून घ्यावें. ५ **आवृत्तीच्या** वेळीं शाळेंतच किंवा घरून मुलांस पाटीवर पोपटाचें वर्णन लिहून आणण्यास सांगावें.

शिक्षकानें पोपटासंबंधीं प्रश्न कसे करावे तें पुढें पहा.

नि. ८२३



नोंद नं. ८७२२

| शिक्षकानें विचारावयाचे प्रश्न | मुलांनीं दिलेलीं उत्तरें फळ्यावर लिहिणें |
|---|---|
| १ ह्या पक्षाचें नांव काय बरें ? | १ ह्या पक्ष्याचें नांव पोपट आहे. |
| २ ह्याचा रंग कसा आहे ? | २ ह्याचा रंग हिरवा आहे. |
| ३ ह्या पोपटाच्या शरिराचे मुख्य भाग किती दिसतात व ते कोणते ? | ३ ह्या पोपटाच्या शरिराचे डोकें व पोट असे मुख्य दोन भाग दिसतात. |
| ४ ह्या पोपटाला कोणकोणते अवयव आहेत ? | ४ ह्याला दोन डोळे, एक चोंच, दोन पाय, पोट आणि पंख हे अवयव आहेत. |
| ५ ह्याला कान व नाक आहे का ? | ५ ह्याचे कान दिसत नाहींत; पण कानाचीं भोकें डोळ्याच्या मागें केसांत झांकलेलीं आहेत व त्यामुळें त्याला ऐकूं येतें. व चोंचीच्या मुळांत दोन भोकें आहेत, तीं भोकें त्याच्या नाकपुडया आहेत. |
| ६ पोपट काय खातो बरें ? | ६ फळें, मिरच्या, पेरू, व भिजलेली डाळ खातो व पाणी पितो. |
| ७ ह्याच्या संवयी काय आहेत ? | ७ पोपट कळप करून झाडावर बसतात. ह्यांना मोकळें उडणें आवडतें. भिंतीच्या वळचणींत घरटीं करतात. त्यांना पिंज- |

| | |
|---|---|
| | त्यांत कोंडून ठेवणें आवडत नाहीं. बोलावयास शिकविलें तर बोलतात. |
| ८ पोपटाची चोंच बांकदार का असते ? कोण सांगेल ? | ८ त्याला फळें फोडून खावयाचीं असतात म्हणून फळें घट्ट धरण्याला बांकदार चोंच फार उपयोगी पडते. बांकदार चोंचींतून फळ निसटून खालीं पडत नाहीं. |
| ९ पोपटाच्या पायाला बोटें किती आहेत व तीं कशीं आहेत ? कोण सांगेल ? | ९ पोपटाच्या पायाला पुढें दोन व मागें दोन अशीं चार बोटें असतात. |
| १० अशा बोटांचा पोपटाला काय उपयोग होतो ? | १० अशा बोटांनीं तो झाडाच्या फांदीला धरून, किंवा पिंज-ऱ्यांतील दांडीला धरून हव्या तशा उड्या मारतो, किंवा फांदीला धरून त्याला चालतां येतें. |

१ ह्याप्रमाणें शिक्षकानें प्रश्न विचारून पोपटाची माहिती त्याला फळ्यावर लिहितां येईल. ही माहिती फळ्यावर लिहिली म्हणजे हा लहानसा पोपटाचा **निबंधच** झाला.

२ **कावळा, गाय, बैल, घोडा, मांजर, चिमणी** ह्यांच्या संबंधानेंही वरीलप्रमाणें माहिती काढून घेतां येईल.

# संक्षेपाचा विस्तार करणें

## वाक्यरचना—नमुना २ रा.

### कवितेवरून

**सूचना**—फळ्यावर कविता लिहून ठेवावी; व ती एकदां शिक्षकानें अर्थबोध होईल अशी हावभाव युक्त वाचून दाखवावी; व तीच कविता मुलांस पुन्हा मनांत वाचण्यास लावावी.

पहा गेले वाजून तीन टोले।
चला शाळेचे तास पुरे झाले।
मुलें गर्दीनें जात्रया निघालीं।
आणि तारांबळ मास्तरांचि झाली. ॥ १ ॥
बसुनि खालीं आंबून अंग गेलें।
लिहुनि पुस्त्या हे हात घाण झाले।
म्हणुनि पर्वाचा तोंड दुखुनि गेलें।
छडया खाऊनी हुळहुळे हात झाले. ॥ २ ॥
वेळ नाहीं मज कुठें थांबण्याला।
उशिर होइल जर घरीं जावयाला।
खास ताई असणार उभी दारीं।
खेळण्याला उत्सूक मशीं भारी. ॥ ३ ॥
आणि आई पाहील फार वाट।
घरीं गेल्यावर थोपटील पाठ।
मला देईल मग खिसा भरुनि खाऊ।
चला जलदीनें घराकडे जाऊं. ॥ ४ ॥

मुलांस ही कविता कितपत समजली हें पहाण्याकरितां कवितें-तील चटकन समजणारा गोषवारा प्रश्नोत्तररूपानें काढून घ्यावा. ह्यावेळीं प्रत्येक चरणाचा अर्थ काढून घेऊं नये.

**गोषवाऱ्याचे प्रश्न**—ह्या चारी कवितेंत कोण बोलत आहे बरें ? तो मुलगा **कोणाशीं** बोलत आहे ? पहिल्या कवितेंत तो **काय** म्हणाला ? दुसऱ्या कवितेंत **काय** म्हणाला ? **तिसऱ्या** कवितेंत तो **काय** म्हणाला ? आणि **चौथ्या** कवितेंत तो **काय** म्हणाला ?

ह्याप्रमाणें प्रश्न केले असतां कवितेंतील मुख्य **नायक** कोण; व तो **काय म्हणत आहे,** हें मुलांच्या लक्षांत चटकन येईल.

नंतर ह्या कवितेंत **गुप्त** असलेला अर्थ काढून घेण्याकरितां मुलांना पुढील **प्रश्न** विचारावे.

१ तीन टोले झाल्यावर शाळा सुटली, अशी ही शाळा शहरां-तील होती कीं खेडेगांवची होती ? **खेडेगांवची.**

२ ही शाळा एकवेळची असेल कीं सकाळदुपारची, दोन-वेळची असेल ?— **दोनवेळची.**

३ पुस्त्या लिहिण्यावरून व पर्वाचा म्हणण्यावरून तो मुलगा कोणत्या यत्तेंत असावा ?—**दुसरींत.**

४ मास्तर छड्या मारीत असत, ह्यावरून काय अनुमान निघतें ? **खेडेगांवची** शाळा असून **मारके मास्तर होते.**

५ त्या मुलाला घरीं भावंडें होतीं कीं नव्हतीं ? किती भावंडें असावीं ? कशावरून ? **फक्त एक बहीणच असावी.**

६ हा मुलगा मोठा ? कीं बहीण मोठी ? **बहीण मोठी होती.** शेवटपर्यंत असे सूचक प्रश्न विचारून, मग आपल्या पदरच्या शब्दांची आणखी भर घालून सुमारें २५-३० ओळींपर्यंत वरील

कवितेवर वाक्यरचना करून घ्यावी. पहिल्यानें आरंभ कसा करावा हें समजण्याकरितां मी थोडीशी गोष्ट लिहून दाखवितों.

एक खेडेगांव होतें, त्या खेडेगांवांत एक बाई रहात होती. तिला एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन मुलें होतीं. मुलगी ९-१० वर्षांची व मुलगा ७-८ वर्षांचा होता. मुलगा मराठी दुसरी यत्ता शिकत होता. एके दिवशीं संध्याकाळीं तीन ठोके पडून रोजच्याप्रमाणें शाळा सुटली; व मुलेंही भराभर घरीं जाऊं लागलीं. शाळेंतील मास्तरही हजेरी, कॅटलॉग वगैरे ठेवून घरीं जाण्यास निघाले. वरील ७-८ वर्षांचा त्या बाईचा मुलगाही त्याच शाळेंतून घरीं जाण्यास निघाला, तो घरीं जातांना आपल्या मनाशींच बोलत होता. तो आपल्या मनाशीं म्हणत होता कीं, तीन तास खालीं बसून अंग कसें अगदीं ताठून गेलें आहे, पुस्त्या लिहून लिहून हातही शाईनें अगदीं घाण झाले आहेत. ..............................

ह्याप्रमाणें कवितेच्या अर्थाला साजतील, असे आपल्या पदरचे शब्द घालून, वरील १६ ओळींच्या कवितेवर ३० ओळींपर्यंत वाक्यरचना करतां येईल. लहान लहान वाक्यें करावी.

---

## विस्ताराचा संक्षेप करणें

---

### वाक्यरचना—नमुना ३ रा.

**थोडक्यांत रामाची कथा**

एखादें **चरित्र** अगर एखादी ४-५ पानाची **मोठी गोष्ट** वाचून,

त्या गोष्टीची **लहान गोष्ट** तयार करून घेणें, ह्यालाच **विस्ताराचा संक्षेप** म्हणतात.

संक्षेप किंवा लहान गोष्ट करतांना, मोठ्या गोष्टींतील **मुख्य मुद्दे** लक्षांत ठेवून, त्या मुद्यांवरच थोडथोडी माहिती लिहावयाची असते, अगर सांगावयाची असते.

ह्या चरित्रासंबंधानें १ कुळकथा, २ बाळपण, ३ भांडण, ४ वनवास, ५ रावणवध, ६ उत्कर्ष, असे मुद्दे ठरवितां येतील. मुलांनीं आपल्या इच्छेप्रमाणेंही संगतवार मुद्दे पाडले तरी चालतील. मुलांनीं आपल्या इच्छेप्रमाणें मुद्दे ठरविणें हेंच योग्य होय. मात्र ते मुद्दे संगतवार असावे.

एवढें मोठें १००–१५० पानांचें रामायणाचें पुस्तक; पण आपणांस ती रामाची कथा **१५-२० ओळींतही लिहितां येते.** ही **मोठी कथा** मी आतां **थोडक्यांत** लिहून दाखवितों.

**१ कुळकथा—**

दशरथ नांवाचा अयोध्या नगरीचा राजा होता, त्याला **कौसल्या, सुमित्रा, कैकेयी** अशा तीन **राण्या** होत्या. ह्या राण्यापासून **राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न,** असे चार मुलगे झाले.

**२ बाळपण—**

जरी हे भाऊ सावत्र होते, तरी त्यांचें एकमेकांवर फार प्रेम असे, ह्या मुलांचा स्वभाव शांत असून ते कधींही भांडत नसत. त्यांच्या सावत्र आयाही त्यांच्यावर प्रेम करीत.

**वसिष्ठ** ऋषि हे त्यांचे गुरु होते, त्यांनीं त्यांना वेदविद्या व धनुर्विद्या शिकविली होती.

मराठी ग्रंथ संग्रहालय
९१२५
स्थळ प्रत
सं. नि. नं. ८२३



**३ भांडण लागलें**—आतां दशरथ म्हातारा झाला होता म्हणून दशरथानें रामाला राज्य देण्याचें ठरविलें. रामाला राज्य मिळणार हें ऐकून, कैकेयीला वाईट वाटलें. कैकेयीनें भांडून आपल्या भरताला राज्य देवविलें व रामाला चौदा वर्षें वनवासास धाडविलें.

**४ वनवास**—दशरथानें कैकेयीच्या म्हणण्याप्रमाणें भरताला राज्य दिलें; व रामाला चौदा वर्षें वनवासास पाठविलें. रामाबरोबर लक्ष्मण व सीता हीं दोघेंही वनवासास निघालीं. भरताचें रामावर फार प्रेम होतें, म्हणून भरतानें राज्याचा स्वीकार केला नाहीं. तोही रामाच्या मागून वनवासास जाण्यास निघाला; पण रामानें त्याची समजूत घातली, तेव्हां भरतानें रामाच्या नांवानें अयोध्येचें राज्य, राम परत येईपर्यंत चालविलें.

**५ रावणवध**—राम, लक्ष्मण, सीता हीं वनवासांत असतांना, रावणानें सीतेला पळविलें. तेव्हां मारुतीनें सीतेचा शोध करून, रामानें लंकेवर स्वारी केली आणि रावणाला मारून सीतेला सोडवून आणलें.

**६ उत्कर्ष**—नंतर चौदा वर्षें पुरीं झाल्यावर राम अयोध्येला आला व भरतानें रामाला अयोध्येचें राज्य परत दिलें. रामानें कांहीं दिवस सुखानें राज्य केल्यावर लोक निंदेला भिऊन, रामानें सीतेला गरोदरपणींच टाकून दिलें, सीता वनांत असतां तिला दोन मुलगे झाले. त्यांचीं नांवें **लव** आणि **कुश** अशीं ऋषींनीं ठेविलीं. हीं दोन मुलें व सीता वनामध्यें वाल्मिकीच्या आश्रमांत राहात होतीं. वाल्मिकी ऋषींनीं यांना विद्या शिकविली. तीं मुलें मोठीं झाल्यावर रामाच्या मागून त्यांना राज्य मिळालें.

ह्याप्रमाणें संगति न सोडतां शेवटपर्यंत मुख्य मुद्यांवर थोडथोडें लिहिण्याची संवय झाली पाहिजे.

## शब्द गाळलेली गोष्ट.

### वाक्यरचना—नमुना ४ था.

एका फुलीबद्दल एक शब्द घालून पुढील गोष्ट पुरी करा.

१ एका जंगलांत एक सिंह राहात होता. २ त्याला एके दिवशीं × मिळाली नाहीं. ३ म्हणून × भुकेनें × घाबरा झाला होता. ४ हिंडतां हिंडतां × × झाडाखालीं × ५ आणि त्याला गाढ × लागली. ६ इतक्यांत एक उंदीर × अंगावर खेळूं × ७ तेव्हां तो × जागा × ८ त्या सिंहानें × × आपल्या × धरिलें. ९ तेव्हां तो उंदीर × × १० सिंहदादा, सिंहदादा, मला तूं × ११ मी तुझ्या उपयोगी पडेन. १२ × बरें म्हणून त्याला सोडून × १३ नंतर एके दिवशीं तो सिंह × सांपडला. १४ हें त्या उंदरानें पाहिलें. १५ मग त्या × आपल्या तीक्ष्ण × तें × तोडलें. १६ आणि सिंहाला × × मोकळें केलें. १७ तेव्हापासून ते दोघे × बनले.

ह्याप्रमाणें शब्द गाळलेली गोष्ट फळ्यावर लिहावी. व ती मुलांस शेवटपर्यंत वाचावयास लावून गोष्टीच्या संदर्भानें मध्यें कोणते शब्द गाळलेले आहेत ते शोधून काढण्यास लावावें व ते शब्द फुलीच्या ठिकाणीं भरून घ्यावे; व सर्व गोष्ट पुरी करावी.

# दीड शहाण्याची गोष्ट.

**वाक्यरचना नमुना ५ वा.—कांहीं शब्द देऊन गोष्ट पुरी करणें.**

उपोद्घात—पुढें शब्द दिले आहेत, त्यांवरून एका दीड शहाण्याची गोष्ट तयार करा पाहूं.

दोघे इसम, पाईं प्रवास, जोडे, छत्र्या, रस्ता, धूळ, नदी, बगलेंत, पायांत, नदी ओलांडल्यावर झाड लागलें, झाडाच्या सावलींत फराळ, एकानें छत्री उघडली, एकानें मिटली, फराळ केला, एकानें दुसऱ्याला त्याच्या विचित्रपणाचें कारण विचारलें, तेव्हां झाडाखालीं बसल्यावर छत्रीची जरूरी असते व नदींत जोडयांची जरूरी असते असें सांगितलें.

शिक्षकानें पहिल्यानें दीड शहाणा कोणाला म्हणतात, ह्याचें स्पष्टीकरण वर्गांत करावें म्हणजे त्या धोरणानें वर दिलेल्या शब्दांवरून मुलें गोष्ट रचतील. शिक्षकानेंही जरूर तेथें थोडी मदत करावी.

**अभ्यास—शहर, म्हातारी, खेडेगांव, मुलगी, जातांना, लांडगा, कोल्हा, वाघ, येतांना, तीन डबे, गादी, गाडी, आवाज** ह्या दिलेल्या शब्दांत आपल्या पदरच्या शब्दांची **भर** घालून एका म्हातारीची गोष्ट रचा.

# एखाद्या पदार्थाचें आत्मवृत्त

**वाक्यरचना—नमुना ६ वा—रुपयाचें आत्मवृत्त.**

उपोद्घात:—रुपें कोठें सांपडतें ? तें कसें शुद्ध करितात ? त्याचे रुपये कसे पाडतात ? रुपयांचा उपयोग काय ? वगैरे जरूर

तितके सूचक प्रश्न मुलांना विचारून माहिती काढून घ्यावी; व मग **रुपयाचें आत्मवृत्त** जुळवून घ्यावें. आत्मवृत्तांमध्यें पदार्थच जणूं-काय आपल्याशीं बोलत आहे, ही कल्पना मुलांना द्यावी. व आत्मवृत्ताला थोडासा आरंभ करून द्यावा. म्हणजे पुढचा मजकूर मुलें जुळवितील. पुढील आत्मवृत्त वाचा:—

---

कांहीं वर्षांमागें मीं अमेरिकेंतील पेरू देशांत दोन मैल खोल अशा खाणींत राहात असें. तेथें शेजारींच माझे भाऊबंदही राहात असत. आम्ही पुष्कळ वर्षें त्या ठिकाणीं निजून काढलीं. एके दिवशीं पुष्कळ लोक कुदळी, खोरीं, फावडीं, घेऊन तेथें आले; व त्यांनीं खणून आम्हांला वर काढलें. त्या वेळीं आमच्या अंगाला फार माती होती. नंतर त्या लोकांनीं आम्हांला एका भट्टींत घालून भाजलें; व शुद्ध केलें. नंतर एका बोटींत बसवून आम्हाला मुंबईस आणलें. मुंबईंत आल्यावर आम्हांला एका कारखान्यांत नेलें. तेथें आमचे तुकडे करून, त्यांच्या वाटोळ्या चकत्या केल्या; व यंत्रांत घालून त्यावर शिक्के मारले व आम्हांला रुपया असें नांव दिलें. नंतर आम्हांला बँकेंत नेऊन ठेविलें. लोक बँकेकडे रुपये मागावयास आले, तेव्हा बँकेच्या मॅनेजरानें मला लोकांच्या हवालीं केलें.

तेव्हांपासून मी हिंदुस्थानांतील किती तरी शहरें एकसारखीं फिरत आहें. एके ठिकाणीं बसणें मला मुळींच आवडत नाहीं. मी लोकांच्या उपयोगी फार पडतों; व लोकांमध्यें भांडणही लावतों. मी वरून जितका चांगला दिसतों, तितका आंतून फार वाईट आहें. म्हणून माझ्याशीं लोकांनीं नीट जपून वागावें.

---

ह्याप्रमाणें निरनिराळ्या पदार्थांचें **आत्मवृत्त** लिहून घेतां येईल.

# निबंध कसे लिहावे ?

## आरंभ

—o—

मुलांनो, तुम्हांस शाळेंत जे निबंध लिहावयास शिकवितात, त्यांचे तीन प्रकार आहेत. त्या तीन प्रकारांचीं नावें येणेंप्रमाणें:—पहिला वर्णनात्मक निबंध, दुसरा कथनात्मक निबंध, आणि तिसरा चिंतनात्मक निबंध, हे ते तीन प्रकार होत. आतां त्या तीन प्रकारांचें क्रमानें वर्णन करूं.

**१ वर्णनात्मक निबंधः**—वर्णनात्मक निबंधांत मनुष्याशिवाय निरनिराळे प्राणी, कीटक, पशु, पक्षी, इमारती, डोंगर, नद्या, पर्वत, यंत्रें, दगड, धोंडे, सोनें, रुपें, लोखंड वगैरे धातु ह्यांचीं वर्णनेंही येतात; सभा, समारंभ, उत्सव ह्यांच्या हकीगतीहि येतात. ह्याशिवाय गिरण्या, कारखाने यांचें वर्णन, प्रवासवर्णन वगैरेही येतें.

**२ कथनात्मक निबंधः**—कथनात्मक निबंधांत मनुष्यांचीं चरित्रें, लढाया, वगैरे हकीगती येतात. म्हणजे ह्या निबंधांत एक प्रकारच्या पौराणिक अगर ऐतिहासिक कथाच येतात, असें म्हणावयास हरकत नाहीं.

हे जे दोन प्रकारचे निबंध सांगितले, त्यांत असे विषय आहेत कीं, त्यांची माहिती आपल्याला डोळे, कान, वगैरे अवयवांच्या साह्यानें मिळवितां येते. विशेषत: डोळ्यांनीं पाहूनच जें काय दिसलें त्याचें वर्णन आपण करीत असतों, किंवा वाचनानें जी हकीगत आपणांस समजली तीच लिहावयाची असते; मात्र

ती हकीगत आपणांस मुद्देसूत व एकापुढें एक संगतवार अशी लिहितां आली म्हणजे झालें. हे निबंध लिहिण्यास अवघड नसतात. आपण सकाळीं उठतों, शौचमुखमार्जन करतों, चहा अगर दूध घेतों, मग अभ्यास करतों, नंतर आंघोळ करून जेवण करतों, नंतर शाळेंत जातों, शाळेंतून पांच वाजतां घरीं येतों, मग खेळतों, नंतर रात्रीचें जेवण करतों, मग अभ्यास करतों, व शेंवटीं देवाची प्रार्थना करून निजतों. हा जसा एकापुढें एक कार्यक्रम आहे, तशाच तऱ्हेचा कार्यक्रम, म्हणजे मुद्दे, वरील निबंधांत पाडावे लागतात. पहिला मुद्दा कोणता, नंतरचा मुद्दा कोणता, त्याच्या नंतरचा मुद्दा कोणता, हें अगोदर नीट ठरवावें लागतें. आपण अंथरुणांतून उठल्याबरोबरच चहा घेत नाहीं. किंवा जेवण करून मग आंघोळ करीत नाहीं. म्हणजे आपल्या वागण्यांत जसा आपण क्रम मोडीत नाहीं, त्याचप्रमाणें निबंधामध्येंहीं क्रम मोडतां कामा नये. सारांश, निबंधामध्यें निबंधाचे मुद्दे एकापुढें एक असेच असले पाहिजेत. त्या मुद्यांची रचना कशी असावी हें, पुढील निबंध वाचले असतां समजून येईल. लहान मुलांमुलींना वर्णनात्मक व कथनात्मक ह्या दोन प्रकारचेच निबंध लिहावयाचे असतात.

**३ चिंतनात्मक निबंधः**—चिंतनात्मक निबंधांत कोणते कोणते निबंध येतात असें जर कोणीं विचारलें तर त्याला नक्की असें उत्तर नाहीं. फक्त पहिल्या दोन प्रकारांत जे निबंध घालतां येत नाहींत, त्यांस ह्या तिसऱ्या प्रकारांत घालावें असें सांगतां येईल. याचें कारण असें कीं, चिंतनात्मक निबंधांत वाचनानें एकाद्या विषयाचा उहापोह करून त्यावर आपलें मत बनवावयाचें असतें. चिंतनात्मक निबंधांत आपले हातपाय, डोळे, कान ह्यांचा फारसा उपयोग होतच नाहीं. फक्त वाचनाचा व बुद्धीचा उपयोग करून दुसऱ्याचीं मतें खोडून काढून

आपलें म्हणणें असल्या निबंधांत मांडावयाचें असतें. असल्या ह्या चिंतनात्मक निबंधांत जे विषय येऊं शकतात त्यापैकीं कांहीं मासल्याकरितां खालीं देतों

१ **म्हणीवरचे निबंधः**—लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडा पाषाण; पांचामुखीं परमेश्वर; अग अग म्हशी, मला कां नेशी; खाई त्याला खवखवे; दिव्याखालीं अंधार. असल्या म्हणींवर निबंध लिहावयास येतात.

२ **कवितेच्या चरणावर निबंधः**—जो दुसऱ्यावरी विश्वासला, त्याचा कार्यभाग बुडाला; न मातेशिवाय अन्य दैवत हो; महापुरें झाडें जाती, तेथें लोहाळे वांचती.

३ **सद्गुणावर किंवा दुर्गुणावर निबंधः**—चोरी, धैर्य, महत्वाकांक्षा, खोटें बोलणें, उधळेपणा, मितव्यय, व्यसनें.

४ **शिक्षणविषयक निबंधः**—स्त्रीशिक्षण, बालसंगोपन, गृहशिक्षण, प्राथमिक शिक्षण, वर्तमानपत्रांपासून फायदे.

५ **सामाजिक चालीरीतींवर निबंधः**—प्रौढविवाह, बालविवाह, पुनर्विवाह, अस्पृश्यता, सहभोजनापासून फायदे-तोटे.

६ **धार्मिक निबंधः**—मूर्तिपूजेपासून फायदेतोटे, चातुर्वर्ण्य योग्य कीं अयोग्य, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद.

७ **राजकीय निबंधः**—मराठी साम्राज्य लयाला जाण्याचीं कारणें, बारभाईचें कारस्थान, पानपतच्या लढाईचा परिणाम, अकबर व शिवाजी ह्यांची तुलना, मुसलमानांचा हिंदुस्थानांत प्रवेश होण्याचीं कारणें, शिवाजीचें आरमारी सामर्थ्य.

८ **व्यापारविषयक निबंधः**—खुला व्यापार म्हणजे काय, संरक्षित व्यापार म्हणजे काय ? हिंदुस्थानची इंग्रजांच्या अमदानींत भरभराट झाली कीं काय ?

अशा तऱ्हेनें चिंतनात्मक निबंधांत अनेक भानगडीचे विषय येऊं शकतात. पण असे भानगडीचे विषय लहान मुलांमुलींना लिहावयाचे नसल्यामुळें त्यांचें जास्त विवरण येथें करीत नाहीं. फक्त मुलांनीं इतकेंच लक्षांत ठेवावें कीं, जे निबंध वर्णनात्मक व कथनात्मक ह्या सदरांत पडत नाहींत ते चिंतनात्मक समजावे. इतकें मुलांनीं लक्षांत ठेवलें म्हणजे पुरे.

**मुलांच्या चुका**:--१ मुलें निबंध लिहावयास लागलीं म्हणजे अगोदर मनांत निबंधाच्या विषयाचा विचार करीत नाहींत. हा निबंध कोणत्या सदरांत जातो, म्हणजे हा निबंध वर्णनात्मक आहे कीं कथानात्मक आहे, किंवा चिंतनात्मक आहे हें ठरवीत नाहींत. २ क्रमवार मुद्दे पाडीत नाहींत. ३ मथळा नीट लिहीत नाहींत. ४ आरंभीं उपोद्घात हा मुद्दा लिहीत नाहींत. ५ शेवटीं उपसंहार हा मुद्दाही लिहीत नाहींत. ६ मुद्दे ठळक लिहावयास पाहिजेत, पण, मुलें अगदीं बारीक मुद्दे लिहितात, ठळक लिहीत नाहींत. ७ मुद्यांच्या मागें मुद्यांचे आंकडे घालीत नाहींत. ८ शुद्धलेखनाकडे व पुन्हा तो निबंध तपासण्याकडे मुळींच लक्ष देत नाहींत. ९ अक्षर वळणदार काढीत नाहींत. असे अनेक दोष मुलें व मुली करतात. अशा अनेक दोषांमुळें परीक्षक साहजिकच निबंधाचा पेपर तपासण्यास कंटाळतात व त्यामुळें मुलांस मार्क अगदीं कमी मिळतात. करितां माझ्या विद्यार्थ्यांनो, हे दोष टाळण्याचा तुम्ही प्रयत्न कराल व मुद्देसूद निबंध लिहाल, तर तुम्हांस निबंधाच्या पेपरांत यश आल्याशिवाय रहाणार नाहीं.

**वाक्यरचना**:--मुलांमुलींना जे निबंध लिहावयाचे असतात ते अगदीं सोपे असतात; अर्थात असल्या निबंधांची वाक्यरचनाही अगदीं सोपी असावी. कांहीं मुलें उगीच मोठमोठे शब्द घालून,

 नि. ८८३

लांब लांब वाक्यें लिहून आपला निबंध बिघडवून टाकतात. लहान मुलांना जशी आपण गोष्ट सांगतों, व त्या गोष्टींत जशीं सुटसुटीत वाक्यें असतात, तशीं निबंधाचीं वाक्यें शक्य तितकीं लहान लहान करावीं; म्हणजे मुलांमुलींचा, लिहितांना गोंधळ होत नाहीं, व मागील वाक्यांचाही पुढील वाक्यांशीं संबंध राहातो. विरामचिन्हां-कडे लक्ष द्यावें. विरामचिन्हें शिक्षकांकडून समजावून घ्यावीं. पण त्याहीपेक्षां तुमच्या क्रमिक पुस्तकांत पूर्ण विराम केव्हां घालतात, अर्धविराम केव्हां घातलेला आहे, स्वल्पविराम केव्हां घातलेला आहे, प्रश्नचिन्ह केव्हां केलेलें आहे, उद्गारचिन्ह केव्हां केलेलें आहे, संयोगी चिन्ह केव्हां येतें, हें नीट पहा. म्हणजे कशा तऱ्हेचें वाक्य आलें असतां कोणता विराम करावयाचा हें तुमच्या लक्षांत येईल.

विरामचिन्हें आणि शुद्धलेखनाचे नियम हे क्रमिक पुस्तकावरून तुम्ही एक महिनाभर जर विचार करून ठरवाल व "असें कां? हें चिन्ह इथें कां? हा अनुस्वार इथें कां? हा शब्द दीर्घ कां? ऱ्हस्व लिहिला तर कसा उच्चार होईल? दीर्घ लिहिला तर कसा उच्चार होईल व तो कानाला बरोबर लागेल काय?" असे प्रश्न मनाला विचारून जर त्यांचीं उत्तरें व्याकरणाच्या रीतीनें तुम्हांस देतां आलीं, तर तुमचें शुद्धलेखन सुधारल्याशिवाय राहाणार नाहीं. ज्या वेळीं तुमच्या प्रश्नांचीं उत्तरें तुम्हांस नीट देतां येणार नाहींत, त्या वेळीं तुमच्या शिक्षकांस विचारा व समजावून घ्या. अशा तऱ्हेनें २० पानें जर तुम्ही पुन्हा पुन्हा १० वेळां वाचून त्यांतील नियम समजावून घेतलेत, तर तुमचें शुद्धलेखन उत्तम झाल्याशिवाय कधींच राहाणार नाहीं, असा आमचा अनुभव आहे.

**शुद्धलेखनः**—शुद्धलेखन नीट येण्यास विभक्तिप्रत्यय, एक-वचन, अनेकवचन, तीन लिंगें, एकवचनी सामान्यरूप, अनेकवचनी

मराठी ग्रंथ संग्रहालय

सामान्यरूप, प्रयोग, एकवचनी वाक्य बनविणें, अनेकवचनी वाक्य बनविणें, पुल्लिंगी वाक्य बनविणें, स्त्रीलिंगी वाक्य बनविणें, नपुंसकलिंगी वाक्य बनविणें, असे वाक्यांचे खेळ तुम्हांस करतां येऊं लागले म्हणजे अनुस्वार कसे बदलतात, केव्हां अनुस्वार हवे, केव्हां नको, हें तुम्हांस समजेल. एका धड्यांतील प्रत्येक वाक्याचे असे खेळ करून पहा, म्हणजे तुमची खात्री होईल.

**शिक्षकांस सूचनाः**—शिक्षकांनींही वर लिहिल्याप्रमाणें मुलांकडून वाक्यांचे खेळ म्हणजे निरनिराळे बदल करून घ्यावे, व अनुस्वरांची व विरामचिन्हांची माहिती करून द्यावी. असें केलें असतां शिक्षकांना श्रम कमी पडून त्यांचें काम लवकर होईल.

विरामचिन्हांबद्दल किती जरी लिहिलें, तरी तें मुलांस समजणार नाहीं. करितां शिक्षकांनींच विरामचिन्हांची माहिती करून द्यावी, किंवा मुलांनीं शिक्षकांच्या मदतीनें क्रमिक पुस्तकांवरून विरामचिन्हें पाहून नियम बसवावे, म्हणजे ते त्यांस समजतील. क्रमिक पुस्तकांतील विरामचिन्हें बरोबर असतात, म्हणून वाचनाचीं पुस्तकें मीं पसंत केलीं आहेत.

**मुद्दे:**—कोणत्याही निबंधाचे मुद्दे ठरवितांना ते मुद्दे घडलेल्या हकीगतीच्या क्रमानें असावे, असें मागें सांगितलेंच आहे. सर्व मुलांचे मुद्दे सारखेच किंवा एकच कधींही असणार नाहींत. जो तो आपआपल्या कल्पनेप्रमाणें मुद्यांची रचना करीत असतो. व ह्या मुद्यांसंबंधानें प्रत्येक मुलामुलीला पूर्ण स्वातंत्र्य असतें. म्हणून दुसऱ्यांचे मुद्दे पाहून लिहिण्यांत कांहींच अर्थ नाहीं. विषयाची माहिती पूर्ण असली म्हणजे मुद्दे एकापुढें एक सुचूं लागतात. उत्तम निबंध लिहितां येण्यास निरनिराळ्या प्रकारचें वाचन व अवलोकन हेंच मुख्य

१०४०

साधन आहे. म्हणून विद्यार्थ्यांनीं आपलें वाचन व अवलोकन हीं वाढवावीं. तरच त्यांस उत्तम निबंध लिहितां येतील.

**उपोद्घातः**—आरंभीं उपोद्घात कसा करावा हें पुष्कळांस समजत नाहीं. उपोद्घात ह्याचा अर्थ विषयाला आरंभ करणें असा आहे तो आरंभ म्हणजे उपोद्घात चार पांच ओळींत करावा. सर्व मुलांचा उपोद्घात सारखाच असला पाहिजे असें नाहीं; प्रत्येकानें आपल्या कल्पनेप्रमाणें उपोद्घात करावा. मात्र तो विषयाला धरून असला पाहिजे.

**उपसंहारः**—उपसंहार म्हणजे निबंध लिहून झाल्यावर त्या निबंधासंबंधानें आपलें मत काय, लोकांनीं काय बोध घ्यावा, हें चारपांच ओळींत लिहावयाचें असतें हा उपसंहारही प्रत्येकाचा वेगवेगळा असूं शकतो. म्हणून विद्यार्थ्यांनीं निबंध लिहिण्याच्या अगोदर उपोद्घातापासून उपसंहारापर्यंत जितक्या मुद्यांवर लिहावयाचें त्यांच्या मनांत असेल, त्या मुद्यांचें आगाऊ कच्चें टांचण करावें. म्हणजे आपल्या निबंधाचे किती मुद्दे पडतात हें त्यांच्या लक्षांत येईल; व मग त्यांस निबंध लिहिण्यास सोपें पडेल. विद्यार्थ्यांना ३० ते ४० ओळी निबंध लिहावयाचा असतो, म्हणून उपोद्घात तीन-चार ओळी व उपसंहार चारपांच ओळी लिहिला म्हणजे पुरे; जास्त नको. बाकीच्या ओळी मधल्या ३।४ मुद्यांमध्यें वांटून द्याव्या म्हणजे झालें. अशी मनांत आगाऊ योजना केली म्हणजे, पुढें निबंध लिहिण्यास व मुद्दे पाडण्यास अगदीं सोपें जाईल. उपोद्घाताची व उपसंहाराची एखादी ओळ वाढली तरी हरकत नाहीं.

# शुद्धलेखनासंबंधीं कांहीं मुख्य नियम.

१ **शक्ति, भक्ति, मति,** असे संस्कृत शब्द **दीर्घ लिहिले** तरी ते **बरोबर धरावे.** मराठींत शेवटचे **इकार, उकार,** आपण दीर्घच उच्चारतों.

२ विभक्तिप्रत्ययांवरचे अनुस्वार मुलांच्या नजरेस वारंवार आणावे. **रामानें, गोविंदानें,—घरीं, दारीं,—घरांत, दारांत** असे अनेक शब्द त्यांच्याकडून लिहून घ्यावे; व नियम बसवावे.

३ **उंट, चंद्र, बंगला, थंडी** अशा शब्दांवर अनुस्वार न दिला तर ते शब्द कानाला कसे लागतील तें विचारावें व अनुस्वाराचें कारण सांगावें. ( उच्चारित अनुस्वार. )

४ **पान—पानें, दार—दारें, घर—घरें,—फूल—फुलें, केळें—केळीं, तळें—तळीं, कुत्रें—कुत्रीं,** असले शब्द घेऊन अनुस्वार कां येतो तें सांगावें. ( नपुंसकलिंगी एकारान्तावर अनुस्वार. )

५ **येथें, जेथें, तेथें, मागें, पुढें, नाहीं, कांहीं, करणें, देणें, घेणें, करतां, करतांना, देतां, देतांना,** ह्या शब्दांवर नेहेमीच अनुस्वार असतो, कारण ह्यांचा उच्चार **नाकांतूनच** होतो. ( ठराविक अनुस्वार ).

६ **तो आंबा—ते आंबे, तो बैल—ते बैल, जो घोडा—जे घोडे** ह्यांतील **ते, जे** ह्या सर्व नामावर नेहेमीं मुलें अनुस्वार देतात ही चूक त्यांस समजावून सांगावी. जो पदार्थ एकदां **पुल्लिंगी** ठरला त्यांचें अनेकवचन केलें म्हणून त्यांचें कांहीं लिंग **बदलत नाहीं. ते आंबे** हें रूप **पुल्लिंगीच** आहे, **ते बैल** हें रूप पुल्लिंगीच आहे, अशी समजूत द्यावी. येथें **ते, जे** ह्या शब्दांवर अनुस्वार नको.

७ एका **बैलाची** गाडी—दोन **बैलांची** गाडी, एका **शहाण्यास**—पांच **शहाण्यांस** अशीं उदाहरणें घेऊन **अनेकवचनी सामान्यरूपावर अनुस्वार** येतो हें सांगावें. **सामान्यरूप** म्हणजे

 नि. ८२३

काय हें मात्र मुलांस समजलें पाहिजे. म्हणून व्याकरणावर अवलंबून असणारे जे अनुस्वार असतील ते मराठी **चौथ्या** पांचव्या इयत्तेमध्येंच समजतील. खालच्या वर्गांत व्याकरणावरून नियम बसवूं नयेत. नुसतीं उदाहरणें फळ्यावर मांडून, जे ठोकळ नियम बसवितां येतील तितकेच खालच्या वर्गांत सांगावे.

८ **मी आहें—आम्ही आहों, मी गेलों—मी गेलें, मी जातों—मी जातें,** अशीं उदाहरणें फळ्यावर मांडून **प्रथम-पुरुषी क्रियापदावर अनुस्वार** येतो हें काढून घेतां येईल.

९ **मुलगा आला, मुलगी आली, मूल आलें, कुत्रा पळाला, कुत्रे पळाले, कुत्रें पळालें, कुत्रीं पळालीं,** अशीं उदाहरणें फळ्यावर मांडून लिंगाप्रमाणें व वचनाप्रमाणें वाक्यें कशीं बदलतात व अनुस्वार कोठें द्यावयाचा व कां द्यावयाचा तें काढून घेतां येईल. (एकारान्त नपुंसकलिंगी शब्दावर अनुस्वार.)

१० रामा **नदीवर** गेला. **बाबू लाडू** खातो. **रामू खाऊ** खातो. असल्या वाक्यांत **दी, बू, डू, मू**, दीर्घ कां? हें समजण्याकरितां **ऱ्हस्व** व **दीर्घ** अशा दोन्ही तऱ्हेनें तें सर्व वाक्य उच्चारण्यास मुलांना लावावें; व कोणता उच्चार कानाला बरा वाटतो तें काढून घ्यावें. व ह्याच तऱ्हेनें ऱ्हस्व दीर्घाचे नियम बसवावे. दुसरा सोपा मार्ग नाहीं.

वर सांगितलेल्या **१० नियमांप्रमाणें** कामापुरतें मुलांना शुद्धलेखन यावयास हरकत नाहीं. शिक्षकांनीं वाचनपुस्तकांतील ३।४ सोपे धडे वरील शुद्धलेखनाच्या नियमाप्रमाणें मुलांना समजावून सांगावे व त्यावर प्रश्न विचारावे. व तेच धडे मुलांना नियम बसविण्यास पुन्हा द्यावे, म्हणजे मुलें पटापट नियम बसवितात, असा माझा अनुभव आहे.


---

# निबंध १ ला, गाय.

—:०:—

१ **उपोद्घातः**–गाय ज्यांनीं पाहिली नाहीं असा एकही मनुष्य हिंदुस्थानांत सांपडणार नाहीं. गाय हिंदु लोकांत पूज्य मानितात. गाईचें दूध लहान मुलांना पाजलें असतां त्यांस तें चांगलें मानवतें. गाईपासून आपणांस बैल मिळतात व त्या बैलांवर आपल्या हिंदुस्थानची शेती अवलंबून असते. म्हणून गाईस माय म्हणजे आई असें म्हटलें आहे. म्हणून आतां त्या गाईबद्दल वर्णन करूं.

२ **वर्णनः**—गाय किंवा बैल आकारानें सारखींच असतात. गाईला आंचळ असतात, हा काय तो त्यांच्यांत फरक आहे. गाईचा रंग तांबडा, काळा, पांढरा, पिवळट, कबरा असतो. किंवा कधीं कधीं तांबडे, काळे, पांढरे असे ठिपकेही असतात. गाईचें तोंड लांबट असतें. मानेखालीं पातळ पडदा



असतो, त्यास पोळी असें म्हणतात. तसेंच खांद्यावर एक मांसल गोळा असतो, त्यांस वशिंड असें म्हणतात. या जनावराला चार पाय, दोन कान, दोन शिंगें, दोन डोळे असतात. शेपटी लांब असून शेंपटीला गोंडा असतो. पायाचे खूर दुभागलेले असतात. खुरांच्या मागें दोन बोटें असतात. त्यांस गेळें म्हणतात. गाईच्या मागील दोन पायांमध्यें दुधाची पिशवी असते, तिला ओटी किंवा कांस म्हणतात. ह्या पिशवीला चार सड असतात. त्यांतून आपणांस दूध मिळतें.

३ **खाणें:**—गाय ही गवत व धान्य खाते. खातांना अर्धवट

चावून गिळते. असें अर्धवट पोटभर खाऊन झाल्यावर मग स्वस्थपणानें पुन्हां तें अन्न तोंडांत आणून लाळेशीं मिळविते, व चघळीत चघळीत गिळून टाकते. ह्या चघळण्यास रवंथ करणें असें म्हणतात. हिला पिण्यास पाणी लागतें.

**४ स्वभावः**—गाय ही जात्या भित्री आहे. सिंह, वाघ यांना ही फार भिते, हिच्या अंगावर थाप मारली असतां तिची कातडी एकदम कांपते. हिचें वांसरूं चुकलें असतां ती एकसारखी ओरडते, ह्या ओरडण्याला हंबरणें म्हणतात. गाई आपआपसांत शिंगांनीं मारामारी करतात. हीं शिंगें त्यांचीं हत्यारेंच आहेत.


**५ उपयोगः**—गाईच्या अनेक जाती आहेत, त्यांपैकीं सोरटी, सिंधी, सुरति ह्या गाई अंगानें फार मोठ्या असतात, व त्या दुधही पुष्कळ देतात. विलायतेंतील गाई रोज १५ शेर दूध देतात. आपल्या इकडच्या गाई फार फार तर २।३ शेर दूध देतात. कोंकणच्या गाई पावशेरापासून दोन शेरापर्यंतच दूध देतात. ह्या दुधाचा फार उपयोग होतो. ह्यांच्यापासून शेण मिळतें. शेणखताचा शेतीला फार उपयोग होतो.

**६ उपसंहारः**—आपल्या हिंदु लोकांत गोमूत्र फार पवित्र मानतात. हिंदुस्थानांतील गाई जर नष्ट झाल्या तर हिंदुस्थानच्या शेतीची फार दुर्दशा होईल, म्हणून हिंदू लोकांनीं गाईला फार पवित्र मानलें आहे. आणि म्हणूनच गोवध करूं नये अशी हिंदुधर्मशास्त्राची आज्ञा आहे. गाईला आईची उपमा दिलेली आहे. कारण मुलाची आई मेली तर, त्या मुलाचें पोषण गाईच्या दुधावर होतें. कांहीं लोक असें म्हणतात कीं, म्हाताऱ्या गाई मारण्याला काय हरकत ? तर त्याला उत्तर एकच कीं, आपली आई जर म्हातारी झाली व ती उद्यां मरणार असें आपणांस समजलें, तर तिला आपण

औषध देण्याचें बंद करतों काय ? किंवा तिला दुखण्याचे हाल होऊं नयेत, म्हणून तिला विषाचा पेला देतों काय? नाहीं. अर्थात् हाच न्याय गोमातेला लाविला पाहिजे. म्हणून हिंदू लोकांनींच नव्हे, तर हिंदुस्थानांतल्या सर्व लोकांनीं गोमातेचें योग्य पालनपोषण करून, तिचा वध बंद करावा असें माझें सांगणें आहे.

---

## निबंध २ रा, कुत्रा.



**१ उपोद्घातः**—कुत्र्याबद्दल लिहिण्याची पाळी आली म्हणजे जो तो आपआपल्यापरी कुत्र्याच्या गुणांचें वर्णन करतो. कोणी त्याच्या शहाणपणाचें वर्णन करतो, कोणी त्याच्या स्वरूपाचें वर्णन करतो, कोणी त्याच्या उपयोगाचें व इमानीपणाचें वर्णन करतो. एकंदरींत काय कीं, कुत्रा हा फार उपयोगी प्राणी असून, त्याचा उपयोग कोणास माहित नाहीं, किंवा तो कोणास आवडत नाहीं असें नाहीं. करितां आपणही त्याचें थोडक्यांत वर्णन करूं.

**२ वर्णनः**—कुत्रा, लांडगा व कोल्हा हे एकाच वर्गांतील प्राणी आहेत. तरी पण त्यांच्यांत थोडथोडा फरक आहे. कुत्र्याला चार पाय असतात, त्याचें तोंड लांबट असतें, पण बुलडॉग कुत्र्याचें तोंड वाटोळें असतें. हा प्राणी मांसाहारी आहे. त्यास सुळे असतात व दाढाही टोंकदार असतात. त्यांच्या योगानें तो कच्चें मांस तोडून खातो. त्याचें शेंपूट वांकडें असतें. तो पळतांना लांब लांब उडया मारीत चालतो. दमला म्हणजे जीभ बाहेर काढतो. कुत्र्याच्या

पंजाला नखें असतात. त्याच्या ओरडण्याला भुंकणें असें म्हणतात. तो रागावला असतां गुरगुरतो किंवा चावतो.

**३. खाणें:**—कुत्र्याला मांस फार आवडतें. त्याला हाडें चघळण्याची फार आवड असते. पाळीव कुत्रे भात, भाकरी, दूध व पाव खातात. कुत्रा जिभेनें पाणी पीत असतांना मच् मच् असा आवाज करतो.

**४. स्वभाव:**—कुत्रा हा माणसाळलेला प्राणी आहे. किंबहुना मनुष्याची संगत असल्याशिवाय त्यास चैनच पडत नाहीं. कुत्र्यास जसें शिकवावें तसें तो शिकतो. कुत्रा हा प्राणी लहान मुलांचा फार आवडता असतो. लहान मुलें व कुत्रें खेळतांना आपण नेहमीं पाहतों; पण लहान मुलांस कुत्रा कधीं चावत नाहीं. कुत्रा धन्याजवळ असला म्हणजे फार खुषींत असतो. त्या वेळीं तो आनंदानें आपलें शेंपूट हालवीत धन्याच्या पायांजवळ नाचत असतो. पण परकी माणसाच्या अंगावर भुंकतो अगर गुरगुरतो. त्यामुळें घराचें रक्षण होतें. कुत्रीला दरखेपेस चारपासून आठनऊ पोरें होतात. हीं पोरें लहान मलांना फार आवडतात. मुलांना ह्या पोरांचा एक खेळच होऊन बसतो.

**५. उपयोग**—कुत्र्याचा मुख्य उपयोग करमणूक व घराची राखण हाच आहे. कुत्रा फार इमानी असतो, म्हणून तो आपल्या धन्याचें घर राखण्याचें फार मोठें काम करतो. तो निजला असला तरी, माणसाची चाहूल लागली कीं जागा होतो. घरांतील बायकामुलांचा तो एक खेळगडीच असतो. तो घरांत असला म्हणजे त्यांस कशाचीही भीति वाटत नाहीं.

**६. उपसंहार:**—देशपरिस्थितीप्रमाणें कुत्र्याचा रंग पांढरा, काळा, तांबडा असतो निरनिराळ्या देशांतील कुत्र्यांच्या आकारांत थोडाथोडा फरक असतो. गांवठी कुत्रे, बुलडॉग, सेंट बर्नार्ड, न्यूफौंडलंड,

शिकारी, असे कुत्र्यांचे अनेक प्रकार असून त्यांच्या स्वभावांत फरक असतो. एकंदरींत विचार केला असतां कुत्रा हा मोठा उपयुक्त असा प्राणी आहे. ज्यास ऐपत असेल त्यानें तो पाळावा. कोणताही प्राणी पाळिला म्हणजे त्याची नीट काळजी घेण्याचें मात्र विसरूं नये. कुत्र्याची निगा नीट ठेविली नाहीं तर त्याला निरनिराळे रोग होतात व ते रोग मनुष्याला होण्याचा फार संभव आहे. करितां त्याची नीट काळजी घ्यावी. कुत्रें पिसाळलें तर त्याला मारून टाकावें. पिसाळलेलें कुत्रें लोकांना चावलें तर तीं माणसें मरतात. पिसाळलेलें कुत्रें चावलेंच तर ताबडतोब दवाखान्यांत जावें, म्हणजे त्या ठिकाणीं योग्य तो उपचार करतात.

## निबंध २ रा, चिमणी.

१. **उपोद्घात:**—चिमणी चिंव चिंव शब्द करीत, अंगणांत किडे व दाणे खातांना आपण नेहमीं पाहातों. लहान मुलें तर चिमणीला धरण्याकरितां फार प्रयत्न करितात, पण ती त्यांना सांपडत नाहीं. एखादे वेळीं चिमणीचें पोर मुलांस सांपडलें म्हणजे, तीं आनंदानें उड्या मारतात, त्या पोराला शाळेंतसुद्धां घेऊन येतात, व वर्गांत मोठी गंमत उडते. अशा त्या चिमणीचें आतां वर्णन करूं.

२. **वर्णन:**—चिमणी सुमारें उंदराएवढी असते, हिला आकाशांतील उंदीर असेंही म्हणतात. हिला एक चोंच, दोन डोळे, दोन



कान, दोन पाय, एक शेपटी व पिसें असतात. हिची शेपटी पिसांचीच बनलेली

असते. हिची चोंच बळकट असते. हिच्या पायांवर पिसें नसतात. पायांला पुढें तीन व मागें एक अशीं चार बोटें असतात, त्यामुळें फांदीवर तिला चांगलें बसतां येतें. नर व मादी असे चिमणीचे दोन प्रकार आहेत. नर हा मादीपेक्षां मोठा असतो. नराच्या डोक्याचा रंग करडा असून पोटाखालीं पांढरा रंग असतो. माने-खालीं गळ्यास मात्र काळा पट्टा असतो. मादीचा रंग मळकट असतो.

३ **खाणें:**—यांचें अन्न लहानपणीं आळ्या, किडे, वगैरे असतें, पण मोठेपणीं सर्व प्रकारचें धान्य चालतें. चिमण्या अंगणांत किडे व धान्य खातांना आपण नेहमीं पहातों. चिमण्या पाणी पितात. पाण्यांत न्हातातही. त्यांचें न्हाणें म्हणजे पाणी उडवून घेणें असतें.

४ **स्वभाव:**—चिमण्या आपलीं घरटीं घराच्या वळचणींत अगर फटींत करतात. घरटें करण्याकरितां तोंडांतून गवत, दोऱ्या, चिंध्या आणतांना त्यांना आपण पहातों. घरटें लहान असून सुबक असतें. चिमण्या दरखेपेस पांच सहा अंडीं घालतात.

५ **उपसंहार:**—चिमणी हा प्राणी जरी लहान आहे, तरी त्याचा उपयोग कांहीं तरी असलाच पाहिजे, चिमण्या, कावळे, ह्यांचा उपयोग आपणांस जरी समजत नाहीं, तरी पण जमीनीतील किडे खाणें हा एक त्यांचा उपयोग असला पाहिजे, असें आपणांस म्हणतां येईल. जमिनीवरील किडे ह्या तऱ्हेनें नाहींसे झाले असतां, आरोग्याच्या दृष्टीनें व शेतीच्या दृष्टीनें फार फायदे असतात.

---


## निबंध ४ था, घोडा.

---

१ **उपोद्घात:**—चतुष्पाद प्राण्यांपैकीं घोडा हा एक प्राणी

आहे. तो मनुष्याच्या फार उपयोगाचा असा असून, मोठा इमानी असतो. म्हणून त्याचें आतां वर्णन लिहूं.

२ **वर्णनः**--घोड्याची लांबी, तोंडापासून शेपटीपर्यंत सुमारें ६।७ फूट असते, व उंची सुमारें ४ ते ६ फूट असते. ह्याला चार



पायांच्या जनावरांप्रमाणेंच सर्व अवयव असतात. पण मानेवर आयाळ असते, व शेपटी झुपकेदार असते. घोडा आणि गाढव ह्यांत बरेंच साम्य आहे. पण गाढवाला आयाळ व झुपकेदार शेपटी नसते. घोडा, गाढव व खेचर हे एकाच वर्गांतील प्राणी आहेत. घोड्याच्या लहान मोठ्या पुष्कळ जाती आहेत. घोड्याच्या लहान जातीला तट्टू असें म्हणतात. घोड्याला वरच्या जबड्यांत दांत असतात, व डोळ्याच्या मागें उभे व लांबट असे दोन कान असतात, गाईबैलांच्या पायांचे खूर आणि घोडयाच्या पायाचे खूर ह्यांत फरक आहे. घोडयाच्या पायाचे खूर दुभागलेले नसतात.

३ **मूलस्थानः**--अरबस्थान, इराण, अफगाणिस्थान, आस्ट्रेलिया, हिंदुस्थान हे देश घोडयाविषयीं प्रसिद्ध आहेत.

४ **स्वभावः**--घोडा हा फार इमानी प्राणी आहे. तो आपल्या धन्यावर फार प्रेम करतो. ह्याबद्दल अरबस्थानांतील घोडयांची फार ख्याति आहे. हा प्राणी गवत, हरभरे खातो. त्याच्या इच्छेविरुद्ध त्याजजवळ कोणी गेलें असतां किंवा त्यास त्रास दिला असतां मागच्या पायांनीं तो लाथा मारतो. धनी अगर नोकर त्याच्याजवळ आला असतां तो आनंदानें खिंकाळतो.

५ **उपयोगः**—घोडा हा फार उपयोगी प्राणी आहे. तो फार


Th. ४१२९

बळकट असल्यामुळें त्याला गाडीला जुंपतात. सैन्यामध्यें घोडयांचा फार उपयोग होतो. घोड्यावरच्या सैन्याला घोडदळ असें म्हणतात. शिलेदार व बारगीर हे घोडदळ सैन्याचेच प्रकार होत. हे शिलेदार व बारगीर आपल्या मराठी सैन्यांत फार होते. तोफा ओढण्याच्या कामीं घोड्यांचा फार उपयोग होतो. पांडवांच्या वेळेला रथाला घोडे जुंपत असत. संस्थानिक, श्रीमंत लोक बहुतकरून घोडे बाळगतात, पूर्वीं टपाल नेण्याकरितां घोड्यांचा उपयोग करीत असत.

६ **उपसंहारः**—अशा रीतीनें घोडा हा प्राणी मनुष्याच्या फार उपयोगी आहे. तो आपल्या धन्यावर फार प्रेम करतो व धन्याचेंही त्याच्यावर प्रेम असतें. आपल्या हिंदुलोकांत दसऱ्याच्या दिवशीं घोड्याची मिरवणूक काढण्याचा प्रघात आहे. ज्याला ऐपत असेल त्यानें घोडा पाळावा व त्यावर बसण्यास शिकावें.

## निबंध ५ वा, मासा.

१ **उपोद्घातः**—मासा सर्वांनीं पाहिलेला आहेच. पण मासा पाण्यांत कसा राहतो ह्याबद्दल आपणांस फार आश्चर्य वाटतें. हवा न मिळाली तर आपण गुदमरून मरूं, पण मासा



कांहीं मरत नाहीं. याचें कारण त्यास पाण्यांत हवा घेण्याची परमेश्वरानें फारच मजेदार युक्ति दिली आहे. माशाची शरीररचना मोठी विचित्र आहे. म्हणून त्याचें आतां आपण वर्णन करूं.

२ **वर्णनः**—पक्षी ज्याप्रमाणें हवेंत उंच उडतात किंवा पोहतात, त्याप्रमाणें मासे पाण्यांत पोहतात. पक्ष्यांप्रमाणें माशांस

पंख असतात. पंखांचा उपयोग करण्याकरितां पंखांचे स्नायु फार मजबूत केलेले असतात. सर्व मासे सारख्या प्रकारचे असतात असें नाहीं. माशांना हातपाय नसतात. हातांपायांबद्दल त्या ठिकाणीं चार पंख असतात. ह्याशिवाय शेपटीकडे दोन व पोटाच्या बाजूला दोन पंख असतात. ह्या पंखांमुळें त्यांस पाण्यांत पोहतां येतें. माशाचें अंग खवल्यांनीं आच्छादिलेलें असतें. खालच्या खवल्यांना चकाकी असते, मासे पाण्यांत फिरतांना चकाकतात. माशाचें शेपूट जोरदार असतें, म्हणून त्यास मैलच्या मैल पोहतां येतें. माशांना दोन डोळे असतात व त्या डोळ्यांच्या मागें खाचेंत दोन्हीकडे एक एक असे दोन कल्ले असतात. मासा तोंडानें पाणी आंत घेतो, व ह्या कल्ल्यांच्या भोंकांतून बाहेर सोडतो. असें करण्याचें कारण पाण्यांतील हवा तो पोटांत घेतो. ह्या कल्ल्यांनीं जमिनीवरील हवाही तो घेतो. त्यामुळें त्याचें रक्त शुद्ध होतें. माशांच्या डोळ्यांस पापण्या नसतत. त्यामुळें ते नेहमीं पाण्यांतही उघडेच असतात. नर व मादी असे माशांत भेद आहेत. मादी लाखों अंडीं घालते, त्यामुळें समुद्र किंवा नद्या माशांनीं गजबजलेल्या असतात.

**३ खाणें:**—पाण्यामध्यें जे खेंकडे, लहान प्राणी, अगर शेवाळ किंवा गाळ असतो, तो हे मासे खातात; इतकेंच नव्हे, पण मोठे मासे लहान माशांना नेहमीं खात असतात. तरी पण नदीमध्यें अगर समुद्रामध्यें ह्या माशांची तूट पडत नाहीं. ह्याचें कारण माशांची वीण मोठी असते.

**४ प्रकार:**—कांहीं मासे अगदींच लहान असतात, पण कांहीं मासे घराएवढे मोठे असतात ! निरनिराळ्या माशांना निरनिराळीं नांवें आहेत. आगबोट बुडाली असतां त्यांतील सामानांच्या पेट्या सुद्धां हे मासे खातात !


**५ उपयोगः**—मासे हें मनुष्याचें अन्न आहे. ह्या माशांचा व्यापार फार मोठा चालतो. ज्या देशांत धान्य फार नाहीं, तेथील लोक ह्या माशांवरच निर्वाह करतात. माशांपासून तेल काढतात. कॉड नांवाच्या माशापासून काढिलेलें तेल अशक्त माणसांना देतात. त्यामुळें चांगली ताकद येते असें डॉक्टर सांगतात.

**६ उपसंहारः**—अशा तऱ्हेनें कावळा, चिमणी, घार वगैरे जसे हवेंत तरंगणारे प्राणी आहेत त्याचप्रमाणें मासे हे पाण्यांत तरंगणारे किंवा पोहणारे प्राणी आहेत. ह्या माशांबद्दल विचार केला म्हणजे परमेश्वराची करणी किती अगाध आहे हें ध्यानांत येतें. मोठा मासा लहान माशाला खाऊन आपला निर्वाह करतो, त्याचप्रमाणें सबळ राष्ट्रें दुर्बळ राष्ट्रांना खाऊन टाकतात हें इतिहासांत आपणांस समजून येईल.

## निबंध ६ वा, हत्ती.

**१ उपोद्घातः**—जमिनीवर राहणाऱ्या पशूंमध्यें हत्ती हा सर्वांत मोठा प्राणी आहे. अगदीं लहान मुलांना हा प्राणी दाखविला असतां, त्यांस त्याचे अवयव मुळींच सांगतां येणार नाहींत असें वाटतें. इतका हा विचित्र प्राणी आहे. म्हणून आतां त्याचें वर्णन करूं.

**२ वर्णनः**—हत्ती हा शरीरानें फार मोठा प्राणी आहे. सर्कशींमध्यें हा हत्ती मुलांनीं पाहिलेला असेलच. हत्ती पहाण्याला मुलांची



फारच गर्दी जमते. आपल्या गणपतीच्या तोंडाप्रमाणें त्याचें तोंड असतें. डोळे बारीक असतात. कान सुपाएवढे मोठे असतात. पाय खांबासारखे वाटोळे व लठ्ठ असतात. शेपटी लहान असते. गणपतीच्या सोंडेप्रमाणें त्याला सोंड असते. ही

सोंड म्हणजे त्याचें नाक होय. सोंडेच्याखालीं त्याचें मोठें थोरलें तोंड असतें. त्याचे दांत फार मोठे असतात. त्याचे सुळे सोंडेच्या पुढें लांब आलेले असतात. पाठीला थोडी कमान असते. त्याचा रंग फिकट काळा असतो. डोकें शरीराच्या मानानें मोठें असतें.

**३ खाणें**:—हा प्राणी जरी मोठा आहे, तरी तो मांस खात नाहीं. ह्याचें खाणें फक्त झाडाच्या डहाळ्या हें होय. पाळीव हत्तीला कणकीचे रोट करून घालतात. हा प्राणी कोणताही पदार्थ सोंडेनें उचलून तोंडांत टाकून चावतो व गिळतो. त्याच्या दाढा फार मोठ्या व पसरट असतात. ह्यास पाणी प्यावयाचें असल्यास तो तें सोंडेंत भरून घेतो व ती सोंड वांकडी करून तोंडांत सोडतो. ह्याची सोंड फार लांब असल्यामुळें ती तो उंच करून झाडांच्या डहाळ्या तोडतो. सोंड ही मांसल भागाची असल्यामुळें व तींत हाडें नसल्यामुळें त्यास ती हवी तशी वांकवितां येते. तो सोंडेनें लहान लहान झाडें सहज उपटून टाकितो.

**४ स्वभाव**:—हत्ती हा जात्या भित्रा आहे, म्हणून तो बुजला म्हणजे पळत सुटतो. हत्ती लवकर माणसाळतो. हा मोठा हुशार प्राणी आहे. त्यास जसें शिकवावें तसें तो ताबडतोब शिकतो. तो माणसाच्या हुकमांत रहातो. म्हणूनच मनुष्यें त्याच्याकडून हवीं तीं कामें करून घेतात. हत्तीचें आयुष्य १०० वर्षें असतें. हत्तीला खाणें फार लागत असल्यामुळें राजे लोकच हत्ती पाळतात.

**५ उपयोग**:—हत्ती हे विशेषतः हिंदुस्थानांत सांपडतात. सिलोन, आफ्रिका येथेंही हत्ती आहेत. त्यांच्या हाडांचा, दातांचा, सुळ्यांचा, बाजारांत खप होतो, हस्तीदंती फण्या तुम्हांस माहीतच आहेत, या हत्तीच्या दातांच्या असतात. हत्तीच्या दांतांना फार किंमत पडते.

नि. ८२३

हत्तीला पकडून मग त्यास माणसाळवितात. हत्तीला एकदां शिकविलें म्हणजे त्याच्याकडून काम करून घेतां येतें. त्याच्याकडून लांकडांचे मोठमोठे ओंडे ओढवितात, सर्कशींत कामें करून घेतात, अंबारीला उपयोग करतात. पूर्वीं लढाईमध्यें हत्तींचा फार उपयोग होत असे. त्यास चालविणाऱ्या इसमास महात असें म्हणतात. तो त्याच्या मानेवर बसतो व हातांत अंकुश घेऊन त्यास चालवितो.

**६ उपसंहारः**—अशा तऱ्हेनें हत्ती हा फार मोठा उपयोगी प्राणी आहे. तो जरी मांस खात नाहीं, तरी सर्व प्राण्यांपेक्षां त्याच्या ठिकाणीं फार मोठी शक्ति आहे. ह्यावरून मांस खाल्लें तरच मनुष्याला शक्ति येईल हें म्हणणें खोटें ठरतें. सर्कशीमध्यें हा हत्ती सर्वांस पहावयास मिळेल. तो अवश्य पहावा.

---

## निबंध ७ वा, नदी.

**१ उपोद्घातः**—नद्या सर्वांनीं पाहिलेल्या आहेतच, ज्यावेळीं विहिरी, नळ, तलाव व धरणें हीं कशीं तयार करावी, हें लोकांस माहिती नव्हतें, त्या वेळीं लोकांनीं जी वस्ती केली ती ह्या नद्यांच्या कांठींच केली व ह्या नद्यांच्या योगानेंच मनुष्यप्राणी आपणांस पाण्याचा उपयोग करून घेत असे.

**२ उगमः**—पावसाचें पाणी डोंगरावर अगर जमिनीवर पडलें म्हणजे, तें जमिनीच्या अगर खडकांच्या फटींत भरून रहातें, व पुढें त्यापासून झरे बनतात. हे झरे खोऱ्यांत सखल भागीं उमटतात, व तेथून सखल प्रदेशाकडे पाण्याचा प्रवाह वाहूं लागतो, व त्या प्रवाहास आणखी झरे मिळतात. अशा तऱ्हेनें तो प्रवाह मोठमोठा होत

जातो; हिलाच नदी असें म्हणतात. नदी अगदीं पहिल्यानें जिथून निघते त्या ठिकाणाला उगम म्हणतात.

**३ प्रवाहः**—अशा तऱ्हेनें लहान नदीला पुढें हळू हळू अनेक लहान लहान नद्या मिळतात. म्हणून लहान नदीची मोठी नदी होते. नदी नेहमीं सखल प्रदेशाकडे वहात जाऊन समुद्राला मिळते. कारण समुद्र हा जमिनीपेक्षां सखल आहे. नदीला मध्यें डोंगर आडवा आला तर ती त्या डोंगराला वळसा घालून, वळणावळणानें वहात जाते; म्हणून नदीचें पात्र वेडेंवाकडें दिसतें. कांहीं नद्या १०००—१५०० मैल लांबीच्या असतात.

**४ उपयोगः**—पूर्वीं नळ, कालवे, धरणें वगैरे नव्हतीं, त्या वेळीं सर्व लोकांनीं नदीच्या कांठींच वस्ती केली, व त्यामुळें मनुष्यांस पाण्याचा उपयोग मनमुराद फुकट करतां येऊं लागला. शेतीलाही ह्या नदीच्या पाण्याचा फार उपयोग होऊं लागला. जनावरांना सुद्धां नदीच्या पाण्याचा फारच उपयोग होतो. वेळेवर पाऊस न पडला तर, नदीचें पाणी मोटेनें काढून, किंवा धरणें बांधून शेतीला देतात. कालवे काढण्याचीही युक्ति निघाली आहे. नदीच्या प्रवाहांतून होड्यांनीं व्यापारही करतां येतो. कांहीं नद्यांच्या प्रवाहांतून गलबतेंही चालतात. ह्यामुळें व्यापाराची सोय होते. अशा तऱ्हेनें नदीचे अनेक उपयोग आहेत.

**५ उपसंहारः**—परमेश्वरानें मनुष्याच्या उपयोगाकरितां ज्या अनेक सोयी निर्माण केल्या आहेत त्यांपैकींच नदी ही एक आहे. ही नदी जर परमेश्वरानें उत्पन्न केली नसती, तर सर्व प्राण्यांचे हाल झाले असते. पिण्यास पाणी मिळालें नसतें. शेतें पिकलीं नसतीं व सर्व लोक पाण्यावांचून मेले असते. परमेश्वरास सर्व प्राण्यांची काळजी आहे, म्हणून त्यानें आपणांस नदीच्या रूपानें पाण्याची

सोय करून दिली आहे. ह्याबद्दल आपण मनुष्यांनीं त्यांचे उपकार नेहमीं मानले पाहिजेत.

---

## निबंध ८ वा, पुणें शहर.

**१ उपोद्घातः**—सुमारें तीनशें वर्षांपूर्वीं पुणें शहर व त्याच्या आसपासचा सर्व प्रदेश मुसलमानांच्या ताब्यांत होता, व त्यावर विजापूरच्या बादशहाची सत्ता होती. त्या वेळीं पुणें शहर हें लहान खेडें होतें, व येथील जहागीर विजापूरच्या बादशहानें शहाजीस दिली होती. पण शिवाजीमहाराजांनीं ह्या प्रदेशीं मराठ्यांचें राज्य स्थापन केलें, व मुसलमानाचा अंमल झुगारून दिला. नंतर बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दींत पुण्याचें वैभव वाढत चाललें; तें सवाई माधवरावांच्या कारकीर्दींत कळसास पोंचलें. हल्लीं इंग्रजांच्या कारकीर्दींतही या शहरास नवीन स्वरूप प्राप्त होऊन उत्तरोत्तर त्याची भरभराटच होत आहे. अशा ह्या शहराचें आपण आतां वर्णन करूं.

**२ स्थापनाः**—शिवाजीच्या वेळीं हें शहर अगदीं लहान होतें. पण पहिल्या बाजीरावानें हें शहर मराठी राज्याची राजधानी केल्यामुळें ह्या शहरास जास्त महत्त्व येऊं लागलें. पहिल्या बाजीरावानें शनिवारचा वाडा बांधला. त्याचें काम बरेच दिवस चाललें होतें. १७२९ मध्यें हा वाडा पुरा झाला. नंतर नारायण पेठ, सदाशिव पेठ, रास्ते पेठ, नानाची पेठ, ह्या पेठा वसल्या. शनिवार पेठ ही पूर्वींची पेठ होय. मराठी राज्याचा सर्व कारभार येथूनच पुढें चालूं लागला. तेव्हां मोठमोठ्या सरदारांस पुण्यास यावें लागे, त्यामुळें त्यांनींहीं ह्या ठिकाणीं मोठमोठे वाडे बांधले. ते अद्याप आपणांस पहावयास मिळतात.

**३ सुधारणाः**--१८१८ मध्यें पेशवाई बुडाली, व मराठी साम्राज्यहीं नष्ट होऊन इंग्रजांचा अंमल सुरू झाला. तेव्हांपासून ह्या शहराचें जुनें स्वरूप जाऊन नवी रचना होऊं लागली. इंग्रजांच्या कारकीर्दींत नव्या तऱ्हेच्या शेंकडों इमारती झालेल्या आपणांस पहावयास मिळतात. त्याचप्रमाणें हल्लीं सडकाही मोठमोठ्या झालेल्या आहेत. आरोग्य व शिक्षण ह्यांच्या सोयीही झालेल्या आहेत.

**४ हवापाणीः**—पुण्यास साधारणपणें २५ इंच पाऊस पडतो. हें शहर बहुतेक नदीकांठीं वसल्यामुळें सर्व पावसाचें पाणी नदीकडे वाहत जातें. त्यामुळें पावसाळ्यांत पावसाचा त्रास होत नाहीं. हें शहर समुद्रसपाटीपासून बरेंच उंच असल्यामुळें येथील हवा कोरडी असते. नळ टाकून पाण्याची सोय केल्यामुळें सर्व शहरास पाण्याचा पुरवठा होतो.

**५ लोकः**--ह्या शहरांत सुमारें दीडलक्ष लोक आहेत. त्यांत हिंदूंची संख्या बरीच आहे. ह्या शहरांत ब्राह्मणवर्गाची वस्तीही बरीच आहे. ब्राह्मणवर्ग हा सुशिक्षित व टापटिपीचा असल्यामुळें इतर वर्गांनाही त्याचें अनुकरण करण्यास चांगलें सांपडतें. त्यामुळें ह्या शहरांतील लोकांच्या चालीरीतीचें अनुकरण इतर शहरें करीत आहेत. बहुतेक लोक नोकर पेशाचे आहेत. वकील आणि व्यापारीही बरेच आहेत.

**६ शिक्षणः**-येथें निरनिराळ्या शिक्षणाच्या जितक्या सोयी आहेत, तितक्या इतर ठिकाणीं नाहींत. म्हणून हें शहर विद्यार्थ्यांनीं गजबजलेलें असतें. मुलगे व मुली मिळून सुमारें १५ हजार विद्यार्थी पुणें शहरांत शिकत आहेत. ह्या ठिकाणीं जेवण्याचाही खर्च कमी येतो. म्हणून इतर ठिकाणचे विद्यार्थी येथें येऊन राहतात. फर्ग्यूसन कॉलेज, न्यू पूना कॉलेज, डेक्कन कॉलेज, शेतकी कॉलेज, सायन्स कॉ-

कॉलेज, ट्रेनिंग कॉलेज, मेडिकल स्कूल, फीमेल हायस्कूल, सेवासदन ह्या शिक्षण देणाऱ्या फार मोठ्या संस्था असून शिवाय लहान मुलांमुलींच्या शिक्षणाच्या शाळा सुमारें ५०-६० आहेत.

७ **पाहाण्याचीं स्थळें:**—वर सांगितलेल्या मोठमोठ्या संस्था पहाण्यासारख्या तर आहेतच, पण त्याशिवाय बेलबाग, तुळशीबाग, पर्वती, ओंकारेश्वर, मार्केट, शनिवारवाडा, बंडगार्डन, रेशमाची गिरणी हीं पहाण्यासारखीं स्थळें आहेत.

८ **व्यापार:**—ह्या शहरीं धान्याचा व फळफळावळीचा फार मोठा व्यापार चालतो. अंजीर, पेरू, केळीं, संत्रीं, डाळिंबें, शिताफळें, ऊंस, गूळ, लुगडीं, कलाबतू हे जिन्नस बाहेर जातात. निरनिराळ्या तऱ्हेचा भाजीपालाही पुष्कळच येतो व बाहेर जातो.

९ **आरोग्य:**—शहराचें आरोग्य राखण्यासाठीं म्युनिसिपालटीनें फारच चांगली व्यवस्था केली आहे. शिवाय म्युनिसिपालटीनें दवाखाने घालून लोकांस फुकट औषधें देण्याचीही सोय केली आहे.

१० **उपसंहार:**—अशा ह्या इतिहासप्रसिद्ध शहराचें वर्णन जितकें करावें तितकें थोडेंच होईल. येथील शिक्षणाच्या व चालीरीतींच्या सुधारणा पाहिल्या म्हणजे,

"ज्यानें पाहिलें नाहीं पुणें, त्याचें व्यर्थ जिणें."

ही म्हण अक्षरश: खरी ठरेल.

---

## निबंध ९ वा, आगगाडी.

१ **उपोद्घात:**—घोड्याची गाडी, बैलांची गाडी, ह्या गाड्या पूर्वीच्या लोकांस माहित होत्या. पण आगीनें म्हणजे विस्तवानें

चालणारी गाडी पूर्वीच्या लोकांस माहित नव्हती. पण अलीकडे सुमारें ७५ वर्षांत ह्या आगीनें चालणाऱ्या गाड्यांचा फैलाव जिकडे तिकडे झाला आहे. त्याबद्दल आतां आपण लिहूं.

**२ इतिहासः**—वाफेच्या योगानें भाताच्या भांड्यावरचें झांकण उडतें, हें सर्वांस माहित आहेच. पण वाफेच्या ठिकाणीं फार मोठी दांडगी शक्ति आहे, व तिचा आपणांस उपयोग करून घेतां येईल हें कोणास माहित नव्हतें. वॉट साहेबानें ह्या वाफेच्या ठिकाणीं मोठी शक्ति आहे असें शोधून काढलें. चहादाणीवरचें झांकण उडत असतांना वॉट साहेबाला मोठें आश्चर्य वाटलें, मग तो वाफेचें यंत्र तयार करूं लागला. शेवटीं त्यानें वाफेच्या शक्तीनें गाडी चालविण्याचाही प्रयोग केला.

**३ इंजीनः**—आगगाडी हल्लीं सर्वांनीं पाहिलेली आहेच. आगगाडींत मुख्य म्हटलें म्हणजे इंजीन होय. हें इंजीन गाडीचे डबे ओढतांना आपण रोज पहातों. डबे ओढण्याचें काम इंजीन करतें. म्हणजे ओढण्याची शक्ति इंजीनमध्यें आहे हें सिद्ध होतें. पाणी तापविण्याच्या बंबाप्रमाणें ह्या इंजिनाची रचना असते. पाण्याखालीं जाळ लावून पाण्याची वाफ तयार करतात, व ती वाफ कोंडून इंजिनाचा दट्टया चालू होतो. दट्टया चालू झाला कीं, त्या दट्टयाच्या योगानें इंजिनाचीं चाकें चालू होऊन इंजिन चालूं लागतें. मग त्या इंजिनाच्या मागें हवे तितके डबे साखळदंडानें एकाला एक जोडतात. म्हणजे आगगाडी तयार झाली.

**४ रस्तेः**—आगगाडी साध्या रस्त्यावरून चालूं शकत नाहीं. लोखंडाचे रूळ टाकून पक्के रस्ते तयार करावे लागतात. ह्या रस्त्यांना खर्चही फार येतो. एक मैल रस्ता करण्याकरितां सुमारें एक लाख

रुपये खर्च येतो! शिवाय स्टेशनें बांधण्याकरितां खर्च येतो तो वेगळाच.

**५ नोकरः**—स्टेशनची व्यवस्था पहाणाऱ्याला स्टेशनमास्तर असें म्हणतात. आगगाडी चालविण्याकरितां व उतारूंना नीट बसविण्याकरितां आगगाडीवर नोकर नेमलेले असतात. आगगाडी चालविणाऱ्याला ड्रायव्हर असें म्हणतात. आगगाडीला कोणत्याही तऱ्हेचा धोका आहे कीं काय हें पहाणाऱ्याला गार्ड असें म्हणतात. ह्याशिवाय इंजिनांत कोळसे व पाणी घालण्याकरितां कांहीं लोक असतात.

**६ फायदेः**—पूर्वी आगगाड्या नव्हत्या, त्या वेळीं बैलगाडीनें काशीस जाऊन येण्यास सहा महिने लागत असत, व खर्चही सुमारें ३००-४०० रुपये येत असे. पण हल्लीं तीन दिवसांत काशीस जातां येतें, व खर्च सुमारें २५ रुपये येतो. इतका जलद व थोड्या खर्चांत ह्या आगगाडीनें प्रवास करतां येतो. व्यापारही वाढण्याचें कारण आगगाडी हेंच आहे. हवा तेथें हवा तेवढा माल अगदीं थोडया खर्चानें आगगाडीनें अगदीं जलद पाठवितां येतो; त्यामुळें दुष्काळ पडला असतां धान्याचा ताबडतोड पुरवठा करतां येतो. सर्व ठिकाणचा माल देशांत ताबडतोब आगगाडीनें पसरवितां आल्यामुळें भावही जिकडे तिकडे सारखे रहातात. अशा तऱ्हेनें ह्या आगगाडीनें लोकांची फारच सोय झाली आहे.

**७ उपसंहारः**—हिंदुस्थानांतील आगगाडया ह्या इंग्रजांच्या ताब्यांत असल्यामुळें अनंत फायदे झाले आहेत, पण कित्येक तोटेही झाले आहेत. गाडीवाले बेकार झाले, इंग्रज लोकांचें भांडवल आगगाडींत गुंतल्यामुळें इंग्रज व्यापारी नफा मिळवितात. आगगाडीला

लागणारें सामान परदेशांतून आणतात, त्यामुळें हिंदुस्थानचे पैसे परदेशांत जातात. पूर्णपणें स्वदेशांतच जर भांडवल व आगगाडीचें सामान ह्यांचा पुरवठा होईल, तर हिंदुस्तान देशाचा आगगाडीनें खरा फायदा झाला असें म्हणतां येईल. तरी पण आज जो थोडा बहुत फायदा होत आहे तो प्रत्येकानें करून घेतला पाहिजे. सरतेशेवटीं ज्या शोधकांनीं मनुष्यप्राण्याच्या सुखांत ह्या आगगाडीनें भर घातली त्या शोधकांचे आपण आभारी असलें पाहिजे, असें म्हणून हा निबंध मी पुरा करतों.

---

## निबंध १० वा, प्रदर्शन.

---

१ **उपोद्घातः**—निरनिराळे पदार्थ जमवून ते सहज रीतीनें लोकांना दिसतील अशा तऱ्हेनें मांडून ठेवणें, व त्यांचें वर्णनही लोकांस वाचावयास मिळेल अशा तऱ्हेनें तेथें जवळच लिहून ठेवणें, ह्यास प्रदर्शन असें म्हणतात. असल्या प्रदर्शनाचे प्रकार, फायदे, वगैरे गोष्टींविषयीं आतां आपण विचार करूं.

२ **प्रकारः**—प्रदर्शनाचे प्रकार पुष्कळ आहेत. ज्या धंद्याचें प्रदर्शन भरविलें असेल, त्या धंद्याचें त्या प्रदर्शनाला नांव देतात. उदाहरणार्थ शेतकीचें प्रदर्शन, गुरांचें प्रदर्शन, हस्तकौशल्याचें प्रदर्शन, धान्याचें प्रदर्शन, शिक्षणविषयक प्रदर्शन, अशीं निरनिराळ्या प्रकारचीं प्रदर्शनें भरवितां येतात.

३ **हेतुः**—प्रदर्शन भरविण्याचा मुख्य हेतु असा असतो कीं, प्रदर्शनांतील वस्तु पाहून व तेथील व्याख्यानें ऐकून अगर तेथील

माहिती मिळवून, आपल्या धंद्यांत त्या त्या लोकांनीं सुधारणा करावी. अशा तऱ्हेनें प्रत्येक देशांतील लोक अगर सरकारें प्रदर्शनें भरवितात व लोकांस त्या त्या धंद्याचें ज्ञान देतात. नंतर लोक आपल्या शेतीवाडीवर अगर कारखान्यांत जाऊन सुधारणा करतात. अशी सुधारणा वेळोवेळीं व्हावी म्हणून दरवर्षी अगर ३–४ वर्षांनीं भलीं मोठीं प्रदर्शनें भरविण्याची पद्धति निघाली आहे. लोकांनीं आपल्या शेतीभातींत अगर कारखान्यांत सुधारणा केली म्हणजे, थोड्या खर्चांत जास्त मालाची पैदास होते, तो माल उघड्या बाजारांत स्वस्त विकतां येतो, आपल्या मालानें इतर देशाचें गिऱ्हाईक बळकावतां येतें, व अशा तऱ्हेनें राष्ट्राची संपत्ति वाढते व पुन्हां नवे नवे कारखाने निघूं शकतात.

४ **उपसंहार**:—पूर्वीं आपल्याकडे जत्रा, उरूस, भरत असत व त्या ठिकाणीं निरनिराळ्या ठिकाणचा मालही येत असे व त्यामुळें ह्या प्रदर्शनांचें काम जत्रा करीत असत. पण हल्लीं जगाच्या चढाओढींत असल्या बाजारांचा फारसा उपयोग नाहीं. प्रत्येक धंद्याच्या शास्त्राची प्रगति दिवसेंदिवस होत आहे. अर्थात शास्त्रीय माहिती देणारीं प्रदर्शनें जर भरतील तर त्या प्रदर्शनांचा उपयोग होईल. इंग्रजांच्या अंमलाखालीं हिंदुस्थानांत भरविण्यांत येणाऱ्या प्रदर्शनापासून हिंदी लोकांचा फायदा होतो कीं इंग्रज व्यापाऱ्यांचा फायदा होतो ह्याबद्दल कांहीं लोक साशंक आहेत; तरीपण जेवढा उपयोग करून घेतां येईल तेवढा ह्या प्रदर्शनांपासून करून घेण्यास आपणांस कांहींच हरकत नाहीं.

# निबंध ११ वा, मांजरीची सहल.


—:o:—

१ **उपोद्घातः**—शाळेंतील शिक्षणक्रमांत सृष्टिनिरीक्षण हा एक विषय असतो. त्या विषयाचें ज्ञान घरीं बसून कधींच होणार नाहीं; अगर पुस्तकें वाचूनही त्याचें यथायोग्य स्वरूप कळणार नाहीं. म्हणून ज्या गोष्टीबद्दल आपणांस ज्ञान मिळवावयाचें ती गोष्ट किंवा तें स्थळ किंवा तो कारखाना प्रत्यक्ष पाहूनच आलें पाहिजे, तरच त्याबद्दल आपणांस योग्य तें ज्ञान होईल. आणि म्हणूनच आमच्या सुपरिंटेन्डेंट साहेबांनीं मुलींना घेऊन मांजरीचे शेतकीप्रयोग पहाण्याचें ठरविलें. त्या हकीगतीचें आतां वर्णन करूं.

२ **तयारीः**—आमच्या सुपरिंटेन्डेंट साहेबांनीं ता. ६।४।३३ रोजीं सकाळीं ६ वाजतां मांजरीला जाणाऱ्या मुलींस शाळेंत जमण्यास सांगितलें होतें. आदल्या दिवशीं भाडयाच्या चार मोटारी सांगून ठेविल्या होत्याच. उद्यां सकाळीं मांजरीस जाणार, सर्व मुली मिळून जाणार, मोटारींत बसून जाणार, ह्या आनंदानें आम्हांस रात्रभर पुरी झोंपसुद्धां आली नाहीं. आम्ही फराळाच्या सामानाचे दोन डबे रात्रीं गच्च भरून ठेवले व मग आम्ही झोंपी गेलों. पहाट झाली व सकाळचे पांच वाजले, तों बोर्डिंगची घंटा झाली. जाणाऱ्या सर्व मुलींची गडबड उडून गेली. सहा वाजेपर्यंत शौचमुखमार्जन व आंघोळी होऊन चहा वगैरे घेतला, इतक्यांत दुसरी घंटा झाली. आम्ही सर्व मुली शाळेंत जमलों. त्या ठिकाणीं मास्तरांनीं आमची हजेरी घेतली, तेव्हां ६० मुली भरल्या. इतक्यांत फों—फों—फों—करीत चार मोटारी आमच्या शाळेपाशीं आल्या, सुपरिंटेन्डेंट साहेबहि आलेच होते. कुळकर्णी मास्तर व कांहीं

शिक्षकिणी ह्या अगोदर येऊन तयार होत्याच. मग आम्ही सर्व जणी मोटारींत बसून अगदीं पावअर्ध्या तासांतच मांजरीला गेलों.

**निरीक्षणः—**



आमच्या मोटारी शाळेपासून ज्या निघाल्या त्या मंडईला वळसा घालून शुक्रवार पेठेंतून शंकरशेट रोडच्या रस्त्यानें मांजरीला गेल्या. तेथें गेल्यावर शेतकीचे कांहीं प्रयोग पाहिले. पिकांचे निरनिराळे मळे पाहिले. निरनिराळ्या तऱ्हेच्या कोंबड्या पाहिल्या. निरनिराळीं शेतीचीं आउतें पाहिलीं. नंतर चहा घेतला व नेलेलें फराळाचें थोडथोडें खाल्लें. नंतर कोरडवाहू पिकें पाहिलीं. त्या पिकांत जोंधळ्याचें पीक फारच नामी आलें होतें. विशेष गोष्ट म्हणजे मातीची उष्णता कशी मोजतात तें पाहिलें. माणसाला थर्मामिटर लावतात,पण जमिनीला थर्मामिटर लावण्याची ही नवीनच युक्ति पाहून आम्हांस फारच हंसूं येऊं लागलें.

**४ भोजनः**—मांजरी फॉर्मवरचे कानिटकर ह्या नांवाचे सुपरिंटेन्डेंट त्या ठिकाणीं होते, त्यांनीं आम्हांसाठीं जेवण्याची फारच चांगली सोय आपल्या पदरच्या खर्चानें केली होती.आम्ही सर्वजणी एकदम जेवावयास बसलों. चारपांचजणी वाढण्याकरितां राहिलों. जेवणाचाही बेत शिरापोळीचा होता. आम्ही जेवत असतांना श्लोकही म्हटले. जणूं काय कानिटकरसाहेबांच्या बंगल्यांत आमचें वार्षिक संमेलनच चाललें आहे असें आम्हांस वाटत होतें. जेवण झाल्यावर लागलीच उंसाचा ताजा रस पिण्याची पाळी आली.

बाहेरच्या मोकळ्या हवेमुळें सर्व अन्न पचून रसावरही आम्हीं हात मारला. इतक्यांत तीन वाजले, तेव्हां गुळाचा कारखाना पहावयास गेलों. तेथें एक तास मोडला. नंतर चार वाजतां पुन्हा मोटारींत बसून लौकरच शाळेंत आलों. त्या ठिकाणीं हजेरी घेऊन मग आम्हांस सोडून देण्यांत आलें.

५ **उपसंहारः**--अशा तऱ्हेनें आमची ही मांजरीची सहल फारच गमतीची झाली. निरनिराळे शेतीचे प्रयोग, निरनिराळीं पिकें, निरनिराळीं शेतीचीं आउतें, नव्या तऱ्हेचीं गुऱ्हाळें, गूळ कसा करतात तें,इत्यादि अनेक प्रकारची माहिती ह्या सहलीपासून आम्हांस मिळाली. हा सुयोग आमच्या सुपरिंटेन्डेंट साहेबांनीं व मांजरी फॉर्मचे सुपरिंटेन्डेंट ह्यांनीं जुळवून आणला, म्हणून त्यांचे उपकार मानावे तितके थोडेच आहेत.

---

## निबंध १२ वा. गणपतीचा उत्सव.

१ **उपोद्घातः**--हिंदुलोकांचे जे अनेक महत्वाचे सण आहेत, त्यापैकीं गणपतीचा उत्सव हा एक सण आहे. घरोघर गणपतीची पूजा करणें ही चाल प्राचीन काळापासून हिंदुलोकांत चालत आलेली आहे. सामुदायिक उत्सव ही परंपरा मात्र थोडी नवी आहे. आणि ती लोकांना फारच आवडली आहे, म्हणून त्या उत्सवासंबंधीं आपण येथें विचार करूं.

२ **स्थापनाः**--भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशीं बाजारांत मिळणारे गणपति विकत आणून किंवा घरींच तयार करून त्यांची वेदोक्त मंत्रानें पूजा करतात व त्या दिवशीं घरोघर गणपतीला नैवेद्य



म्हणून मोदक करतात. लहान मुलांना गणपतीची आरास व पूजा करणें ह्या गोष्टी फार आवडतात. कांही ठिकाणीं दीड दिवस गणपति ठेवतात. सामुदायिक उत्सव निघाल्यापासून अनंत चतुर्दशीला मोठी मिरवणूक काढून त्या दिवशीं गणपति विसर्जन करतात.

**३ सामुदायिक उत्सवः**——सामुदायिक गणपतीउत्सव चालू झाल्यापासून ह्या उत्सवास निराळेंच वळण लागत चाललें आहे. सामुदायिक उत्सव सुमारें दहा अकरा दिवस चालतो. ह्या उत्सवांत आळीआळीच्या गणपतीपुढें कथाकीर्तनें, व्याख्यानें, पोवाडे, नकला, खेळ, मेळे वगैरे अनेक प्रकार होत असल्यामुळें ह्या उत्सवास आकर्षक असें स्वरूप प्राप्त झालें आहे. ह्या दहा दिवसांत जिकडेतिकडे मजेचे कार्यक्रम होत असल्यामुळें लोकांच्या झुंडीच्या झुंडी व्याख्यानें ऐकण्यास व मेळे पहावयास जात असतात.

**४ फायदेः**——सामुदायिक उत्सवाच्या योगानें लोकांच्या आंगीं जुटीनें काम करण्याची पात्रता येते. व्याख्यानें, मेळे, ह्यांच्या योगानें निरनिराळ्या विषयांवरची मनोरंजक माहिती आपणांस मिळते. मेळेवाल्यांनीं मात्र एखाद्या व्यक्तीवर किंवा एखाद्या समाजावर निंदापर पदें म्हणण्याची वाईट संवय सोडून द्यावी. दिवसेंदिवस मेळेवालेही असलीं पदें म्हणण्याचें बंद करीत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. गणपतीच्या उत्सवांत व मिरवणुकींत हिंदूंतील सर्व जातींच्या लोकांनीं, भेदभाव न ठेवतां मिसळण्याची जी हल्लीं वहिवाट पडत आहे ती फार चांगली आहे, व तिचा चांगला परिणाम झाल्यावांचून राहाणार नाहीं.

**५ उपसंहारः**—अशा तऱ्हेचा ह्या जो गणपतिउत्सव तो जरीं फार पूर्वीपासून हिंदूंच्या घरोघर दरवर्षीं होत आलेला आहे, तरी त्याला सार्वजनिक स्वरूप लोकमान्य टिळकांनीं दिलें व तेव्हांपासून ह्या उत्सवाला एक वेगळेंच वळण मिळालें आहे. ह्या उत्सवाचा राष्ट्रीय दृष्ट्या व धार्मिक दृष्ट्या चांगला उपयोग करून घेणें हें पुढाऱ्यांचें व लोकांचें काम आहे.

---

## निबंध १२ वा, लग्न.

**१ उपोद्घातः**—हिंदुलोकांच्या अगर खिस्ती लोकांच्या अगर मुसलमान लोकांच्या किंवा इस्राइल लोकांच्या धर्मांत मनुष्याला जन्मल्यापासून मरेपर्यंत कांहीं तरी संस्कार करावे लागतात. निरनिराळ्या धर्मांच्या लोकांचे कमीअधिक प्रमाणानें संस्कार असतात. हिंदु लोकांमध्यें सोळा संस्कार मानले आहेत. त्यांपैकीं लग्न हा एक महत्त्वाचा संस्कार आहे.

**२ साखरपुडाः**—मुलगा व मुलगी पसंत पडली म्हणजे लग्नाचा बेत ठरविण्याकरितां मुलाकडची व मुलीकडची मंडळी मुलीच्या घरीं जमतात, व दागदागिने किती घालावयाचे, हुंडा किती द्यावयाचा, करणी काय करावयाची, ह्याबद्दल वाटाघाट होऊन लग्नाचा मुहूर्त ठरवितात. मग लग्ननिश्चय ठरला असें समजण्याकरितां, मुलाची आई अगर जाणती बाई मुलीला कुंकूं लावून खण देते, व हातांत खाऊचा पुडा देतात. ह्या पुड्यांत पेढे, साखरफुटाणे वगैरे खाऊ असतो. साखरपुडा झाल्यावर लग्न मोडण्याची बहुतेक धास्ती नसते. म्हणून दोन्हीकडची मंडळी नंतर लग्नाच्या तयारीला लागतात.

**३ अक्षत**:—लग्नाचा बोलावणीं करण्याकरितां, लांबलांबच्या नातेवाईकांना टपालांतून लग्नपत्रिका पाठवितात. ह्या पत्रांना शुभकारक म्हणून कुंकू लावतात, अगर तीं पत्रें तांबड्या शाईनें छापितात. नवऱ्याकडची व नवरीकडची मंडळी अगोदर गांवांतील मुख्य देवाला अक्षत देऊन मग गांवांत आपल्या ओळखीच्या ठिकाणीं घरोघर फिरून बोलावणीं करतात. बोलावणीं करावयास जातांना रुप्याच्या वाटींत तांदूळ व सुपाऱ्या घेऊन जातात. बोलावणीं करावयास एक पुरुष व एक स्त्री जाते. पुरुष पुरुषांचीं बोलावणीं करतो व स्त्री स्त्रियांचीं बोलावणीं करिते. बोलावणीं करतांना तांदूळ हातावर ठेवून नवरानवरी ह्यांची माहिती करून देतात. अक्षता म्हणजे तांदूळ असा अर्थ आहे व त्यावरून अक्षत हा शब्द झाला आहे.

**४ सीमांतपूजन**:—पूर्वीं नवरा मुलगा नवरीच्या गांवीं लग्नाकरितां जात असे, तो नवरीच्या गांवाच्या सीमेवर गेला म्हणजे नवरीकडील मंडळी त्याचें स्वागत करण्याकरितां त्या सीमेवर येऊन, त्या नवऱ्यामुलाचें पूजन करीत असत; व त्यास पोशाख देऊन, आपल्या घरीं घेऊन जात असत. ह्या पूजनासच सीमांतपूजन म्हणतात. पण हल्लीं गांवांतल्या गांवांतच नवरानवरी असली म्हणजे, नवऱ्या मुलाच्या घरींच हें सीमांतपूजन करतात व त्यास पोशाख देतात व भिक्षुक लोकांस दक्षिणा वांटतात.

**५ उष्टी हळद व तेलफळ**:—नवरीकडील मंडळी नवरीच्या अंगाला लाविलेली उष्टी हळद नवऱ्या मुलाकडे आणतात, व ती त्याच्या अंगास लावून आंघोळ घालतात. नंतर नवऱ्या मुलाकडून नवरीकडे तेलफळ पाठवितात. ह्या तेलफळामध्यें तेलाची तपेली, साडी, चोळी, दागिने, खण, नारळ, फळफळावळ, पेढे इत्यादि वस्तु अस-

तात. तेलफळ आल्यावर नवरी गौरीहराची पूजा करते. गौरीहर सर्व मुलांमुलींनीं पाहिला आहेच.

६ **आहेरः**—वर सांगितलेला विधि झाल्यावर नवऱ्याचीं नातेवाईक माणसें नवऱ्याच्या घरीं नवऱ्याला व नवऱ्याच्या आईबापांना आहेर करतात व मुलीच्या घरीं मुलीचीं नातेवाईक माणसें मुलीला व मुलीच्या आईबापांना आहेर करतात. आईबाप नसले तर वडील माणसांना आहेर करतात.

७ **रुखवत व मूळः**–आहेराचा समारंभ आटोपल्यावर मुलीकडून नवऱ्याकडे रुखवत येतें, व त्या रुखवताबरोबर घोडा किंवा हत्ती येतो. रुखवतामध्यें करंज्या, लाडू वगैरे फराळाचे जिन्नस आणतात. ते नवऱ्या मुलाकडची मंडळी खाऊन टाकतात. नंतर नवरा मुलगा आलेल्या घोड्यावर बसून, नवरीकडे लग्नाला जातो. नवऱ्या मुलास घोडा घेऊन आणावयास जाणें ह्यासच मूळ असें म्हणतात.

८ **लग्नः**—पाठविलेल्या घोड्यावर बसून नवरा मुलगा नवरीच्या घरीं जातो. मग नवरीची आई त्याच्या पायांवर पाणी घालते, व दहीभात ओंवाळून टाकते. मग नवरा मुलगा पाटावर बसतो, व मग त्यास दहीं, मध वगैरे देऊन तो पाटावर उभा राहतो, त्याच्या पुढें अंतरपाट धरून समोरच्या पाटावर नवरी मुलगी उभी करतात. व मंगलाष्टकें म्हणून लग्नघटका भरली म्हणजे नवरा व नवरी एकमेकांच्या गळ्यांत फुलांच्या माळा घालतात, म्हणजे लग्न लागलें. ह्या वेळीं बाहेर वाजंत्रीं वाजत असतात.

९ **वरातः**—लग्न लागल्यावर ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणें नवरा मुलगा मुलीच्या घरीं एकदोन दिवस रहातो; जेवणावळी वगैरे होतात व मग रात्रीं चांगला मुहूर्त पाहून नवरा मुलगा नवऱ्या

५०४०

मुलीला घेऊन आपल्या घरीं येतो. मग त्या नवऱ्या मुलीचें सासरचें नांव ठेवतात, व दुसऱ्या दिवशीं नवऱ्या मुलाकडे जेवणावळ होऊन हा लग्न समारंभ आटपतो.

१० **उपसंहारः**—अशा तऱ्हेनें आपल्या हिंदुसमाजामध्यें हा लग्नसमारंभ आटपतो. प्रत्येक धर्मामध्यें निरनिराळ्या पद्धतीनें हा लग्नसमारंभ होतो. मुसलमान लोक काजीकडून किंवा धार्मिक मनुष्याकडून लग्न लावितात. ख्रिस्ती लोक चर्चमध्यें लग्न लावितात. कांहीं लोक आपलीं लग्नें धर्मविधीनें न करितां नुसतीं रजिस्टर करितात. परंतु धर्मविधीनें लग्न करणें हें फार चांगलें असें सर्व लोकांचें मत आहे.

---

## निबंध १४ वा, दिवाळी.

ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत नं. नि. ८७३ ता.

१. **उपोद्घातः**—दिवाळी हा सण हिंदु लोक विशेष महत्त्वाचा मानतात. दिवाळी हा शब्द, दीप+आवलि, ह्या दोन संस्कृत शब्दांपासून झालेला आहे. 'दीप + आवलि' ह्याचा अर्थ दिव्यांची ओळ' असा आहे. सर्व हिंदु लोक दिवाळींत जिकडेतिकडे संध्याकाळीं दिवे लावतात व हे दिवाळीचे चार पांच दिवस मोठ्या आनंदांत घालवितात. म्हणून ह्या सणाचें फार महत्त्व आहे. आतां ह्या सणाचें आपण वर्णन करूं.

२ **वर्णनः**—आश्विन वद्य चतुर्दशीपासून कार्तिक शुद्ध द्वितीयेपर्यंत ह्या सणाचें महत्त्व आहे. ह्या दिवसांत पाऊस वगैरे बंद झालेला असतो. शेतकरी लोकांचीं शेतेंभातें पिकून कापणीस यावयाचीं असतात. शेतकरी लोकांना आपलें उभें पीक पाहून आनंद झालेला असतो. व्यापारी लोकही आपले हिशेब पुरे करून नफा

झाल्यामुळें आनंदांत असतात. सर्व शाळांना सुट्टी असल्यामुळें मुलें व मुली आनंदांत उड्या मारीत असतात. सासरच्या मुली माहेरीं येत असतात, जावईबुवांनाही दिवाळसणाकरितां बोलावणीं येत असतात. अशा तऱ्हेनें ह्या ४–५ दिवसांत मुलांमुलींचा, नव वधुवरांचा, सासूसासऱ्यांचा, शेतकरी–व्यापाऱ्यांचा आनंद, त्यांच्या पोटांत मावेनासा होतो. लोक आपआपलीं घरें रंगवितात, आंगणीं सारवितात. एकीकडे बायका करंज्या–लाडू करण्याच्या धांदलींत असतात, दुसरीकडे मुलें किल्ले बांधण्याच्या व फटाक्यांच्या नादांत असतात.

३ **न्हाणी:**—नरकासुराला श्रीकृष्णानें आश्विन वद्य चतुर्दशीस मारलें, म्हणून ह्या तिथीला नरकचतुर्दशी असें म्हणतात. ह्या



दिवशीं पहाटे लोक अंगाला उटणें लावून आंघोळ करतात, व नरकासूर मारल्याची खूण म्हणून कारीठ ह्या नांवाचें फळ पायाखालीं तुडवितात. मग करंज्या, लाडू वगैरे दिवाळीच्या फराळाचें सामान वाढतात. फराळ झाल्यावर मुलें खेळतात.

४ **लक्ष्मीपूजन:**—आश्विन वद्य अमावास्या ह्या दिवशीं देवांनीं लक्ष्मीची सुटका केली, अशी पौराणिक कथा आहे, म्हणून ह्या दिवशीं व्यापारी लोक लक्ष्मीची पूजा करतात व आपापल्या दुकानांत दिवे व आरास करून लोकांना पानसुपारी वांटतात व दारूसामान उडवितात. दुसऱ्या दिवशीं कार्तिक शुद्ध प्रतिपदा असते. ह्या दिवशीं व्यापारी लोक जमाखर्चाच्या नव्या वह्या घालून त्यांची पूजा करतात. हा दिवस व्यापारी लोकांच्या पुढच्या वर्षाच्या आरंभाचा असतो.

५ **भाऊबीज**:—यमुना नदी यमाची बहीण आहे, अशी पौराणिक कथा आहे. तिनें आपल्या भावाला घरीं नेऊन उटणें लावून आंघोळ घातली व उत्तम उत्तम पदार्थ करून त्याला वाढले; तेंव्हां यम तृप्त झाला. तेंव्हां यमुनेनें यमाजवळ वर मागून घेतला कीं, ह्या दिवशीं जे लोक माझ्या स्मरणार्थ आंघोळ करतील त्यांना यमदंड नसावा. तेंव्हांपासून बहिणीनें भावाला बोलावून ओवाळण्याची पद्धत पडली आहे. हा ओवाळण्याचा समारंभ कार्तिक शुद्ध द्वितीयेला होतो.

**उपसंहार**:—अशा तऱ्हेनें हा दिवाळीचा सण लोक मोठया आनंदानें साजरा करतात. बायकांची दिवाळींचें सामान करण्याची घाई, व मुलांची फटाक्यांची धांदल ह्यामुळें ह्या सणाला हल्लीं फारच महत्त्व आलें आहे. ह्या सणानिमित्त निरनिराळे लोक घरीं येतात. करंज्या, लाडू खातात; एकमेक खेळतात, व वर्षाचा शीणभाग घालवितात आणि ताजेतवाने होऊन पुढें आपापल्या उद्योगास लागतात. एकमेकांत मैत्री वाढण्याला ह्या सणाचा चांगला उपयोग होतो. अशा तऱ्हेचे सण यथाशक्ति साजरे करावे.

---

## निबंध १५ वा, पाऊस.

—:०:—

१ **उपोद्घात**:—प्राणिमात्राच्या जीवनास ज्या अनेक गोष्टी लागतात, त्यांपैकीं पाऊस ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे, म्हणून त्याबद्दल आपण आतां विचार करूं.

२ **पावसाचें कारण**:—पाण्याची वाफ हवेपेक्षां हलकी असते. सूर्याच्या उष्णतेनें पाण्याची वाफ होऊन ती वर जाते व

हवेमध्यें सांठून रहाते. त्या वाफेला थंडी लागली म्हणजे त्या वाफेचे ढग बनतात व तेच ढग जास्त थंड झाले म्हणजे त्यांचा पाऊस पडतो; किंवा बर्फासारख्या गारा होऊन खालीं पडतात.

**३ देखावाः**—आपल्या हिंदुस्थानांत उन्हाळ्याच्या दिवसात अतिशय उन्हाळा भासतो. चैत्रवैशाखामध्यें तर दुपारीं बाहेरही पडण्याची पंचाईत पडते. अशा वेळीं पाऊस पडून जिकडे तिकडे गारीगार होईल तर मजा होईल असें वाटूं लागतें. तों इतक्यांत पाऊस पडूं लागतो व मनाला हुषारी वाटू लागते. लहान लहान मुलें पावसांत उडया मारूं लागतात व पडलेल्या गारा वेंचून खाण्यांत त्यांस फारच मौज वाटते. मोठया माणसांनाही उन्हाळ्याचा कंटाळा आलेला असतोच. पाऊस पडल्यामुळें त्यांनाही काम करण्याला आनंद वाटतो व वेळेवर पाऊस पडला म्हणजे शेतकरी लोकांना तर त्यांचा आनंद पोटांत मावेनासा होतो.

**४ उपयोगः**—जनावरें, मनुष्यप्राणी ह्यांचें जीवन मुख्य शेतीवर असतें. शेत पिकलें तर खावयास मिळणार. पण शेतीचा धंदा पावसावर अवलंबून असणार. म्हणून पावसाची अत्यंत आवश्यकता आहे. शिवाय पिण्यास,आंघोळ करण्यास व कपडे धुण्यास पावसाच्या पाण्याचा फारच उपयोग आहे. पाऊस जर न पडेल; तर तळीं, विहिरी, नद्या, हीं आटतील व मनुष्यप्राणी मरून जाईल. ह्याकरितां पावसाचा आपणांस फार उपयोग आहे. निरनिराळ्या देशांत पाऊस पडण्याचा काळ वेगवेगळा असतो.

**५ उपसंहारः**—अशा तऱ्हेचा पाऊस पाडणारा व सर्वांना आनंद देणारा जो परमेश्वर त्याची आपण प्रार्थना करून त्यास शरण जाणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे.

# निबंध १६ वा, हळदकुंकू.

१ **उपोद्घातः**—चैत्र महिना आला म्हणजे आपल्या हिंदु लोकांत गौरीचें हळदकुंकू करण्याचा प्रघात आहे. हळदकुंकू करण्याचा विशेष प्रचार पडण्याचें कारण धार्मिकपणा हें तर आहेच, पण आपल्या आळींतल्या बायकांनीं व ओळखीच्या बायकांनीं आपल्या येथें येऊन हळदकुंकू, खिरापत व रस आणि पन्हें घेऊन जावें, व अशा तऱ्हेनें नव्याजुन्या बायकांची ओळख व्हावी हाच याचा विशेष हेतु आहे.

२ **बोलावणीं**:—उद्यां हळदकुंकू असलें म्हणजे, आदल्या दिवशीं आळींतल्या बायकांना मोलकरणीच्या हातीं बोलावणीं करण्याची पद्धत आहे. पण अलिकडे मोठमोठ्या शहरांतून मोलकरणी मिळत नसल्यामुळें छापील कार्डेंच पाठवितात व त्यांत 'उद्यां आमचे येथें हळहकुंकू आहे; करितां लेंकी, सुना, मैत्रिणी ह्यांना घेऊन हळदकुंकवास या' असें बोलावणें असतें.

३ **आरास**:—गौरीचें हळदकुंकू असलें म्हणजे आदल्या दिवसापासून घरांतील मुलांमुलींना व बायकांना आपली गौर सजविण्याचा व फराळाचें करण्याचा ध्यासच लागलेला असतो. त्या दिवशीं बायकांना रात्रभर झोंपसुद्धां येत नाहीं. इकडून तिकडून चित्रें आणून गौरीपुढें ठेवण्याची मुलांमुलींची धांदल उडालेली दिसते. मोठीं माणसेंही गौर मांडण्यास मदत करतात. उतरत्या उतरत्या पायऱ्या करून त्यांवर चित्रें, कलाकौशल्याचीं कामें, फळें, पक्वान्नें वगैरे ठेवितात. अगदीं वर डोलाऱ्यांत गौर मांडलेलीच असते. गौरीची मूर्ति पितळेची केलेली असते. अगदीं खालीं गौरीचीं दोन

बाळें म्हणून मांडलेलीं असतात. ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणें गौरींचीं आरास करतात. राजेरजवाडे यांच्या घरची गौरीची आरास पाहाण्या-सारखी असते.

४ **हळदकुंकूः**——अशा तऱ्हेनें गौर मांडून झाली म्हणजे, संध्या-काळीं चार वाजल्यापासून बायका हळदकुंकवास येऊं लागतात. बायका येऊं लागल्या म्हणजे त्यांस घरच्या बायका हळदकुंकू, अत्तरगुलाब, फुलें, खिरापत, डाळ, हरभरे, रस, पन्हें देतात. कांहीं ठिकाणीं चंदनाची उटीही लावण्याचा प्रघात आम्हीं पाहिलेला आहे. अशा तऱ्हेनें आलेल्या बायकांचें यथाशक्ति आदरातिथ्य करून त्यांची बोळवण करितात.

५ **फराळः**—संध्याकाळीं सात आठ वाजेपर्यंत अशा तऱ्हेनें बोलाविलेल्या बायका येऊन गेल्यावर, पुरुषमंडळी व त्यांची मित्र-मंडळी व घरांतील मुलें-मुली व इतर मदतगार बाया यांचा फराळ होतो. गौरीपुढें जे जे पदार्थ ठेविलेले असतात, ते ह्या मंडळीस वाढतात, व मग ही मित्रमंडळी निघून जाते. मग घरांतील मंडळीचें रात्रीं जेवणखाण होऊन हा समारंभ आटोपतो.

६ **उपसंहारः**—ही दळदकुंकवाची जी पद्धत पडली आहे, तींत धार्मिकपणा तर आहेच, पण या हळदकुंकवाच्या समारंभाला राष्ट्रीय दृष्टयाही विशेष महत्व आहे. ह्या समारंभानें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, स्पृश्य, अस्पृश्य वगैरे सर्व जातींच्या बायका एके ठिकाणीं येऊन भेदभाव न ठेवतां त्यांना एकमेकांत मिसळण्याला संधी सांपडते व एकमेकांचे गैरसमज दूर होतात. म्हणून हळदकुंकवाच्या समारंभाची राष्ट्रीय दृष्टीनें फार उपयुक्तता आहे.

# निबंध १७ वा, शिवाजी.

१ **उपोद्घातः**—भोंसल्यांच्या घराण्याची उत्पत्ति चितोडच्या रजपूत घराण्यापासून झाली असें म्हणतात. म्हणून भोंसले हे रजपूत किंवा क्षत्रिय होत. ह्या भोंसले घराण्यांतील लोक खेडोपाडीं पाटी-लक्या करीत असत. त्यांपैकींच मालोजी हा होता. तो स्वपराक्र-मानें निजामशाहींत सरदार झाला. त्यास शहाजी व सरीफजी असे दोन मुलगे होते. मालोजीच्या मागें शहाजीनें स्वपराक्रमानें त्या जहागिरींत आणखी भर घातली. शहाजीला जाधवरावांची मुलगी जिजाबाई दिली होती. तिच्या पोटीं शिवाजीमहाराज जन्मास आले, व त्यांनींच पुढें मराठी साम्राज्याचा पाया घातला. अशा त्या शिवाजी-महाराजांचें आपण वर्णन करूं.

२ **बालपणः**—शिवाजीमहाराज यांचा जन्म शिवनेरी किल्ल्यांत १६३० सालीं झाला. शहाजी हे विजापूरकरांच्या नोकरींत असल्या-मुळें ते विजापूरच्या बाजूला कामगिरीवर असत; अर्थात् शिवाजी-महाराजांचें सर्व बालपण त्यांच्या आईच्या सहवासांतच गेलें. जिजा-बाईला स्वप्न पडल्यामुळें, आपला मुलगा पुढें मराठी राज्य स्थापणारा होणार, ह्या आशेनें त्यास तिनें उत्तम प्रकारचें शिक्षण दिलें. ज्याप्रमाणें रामाचे गुरु वसिष्ठ त्याचप्रमाणें शिवाजीचे गुरु रामदास, व दादोजी कोंडदेव होत. शिवाजीमहाराजांनीं वीरास शोभेल असें आईच्या व दादोजी कोंडदेव ह्यांच्या देखरेखेखालीं शिक्षण घेतल्या-वर, त्यांच्या मनांत मुसलमानांचा अमंल झुगारून देऊन मराठेशाही स्थापण्याची कल्पना आली. ह्या वेळीं त्यांचें वय सोळा वर्षांचें होतें.

३ **नंतरची कामगिरीः**—नंतर शिवाजीमहाराजांनीं आपल्या जहागिरीची व आसपासच्या प्रदेशाची पहाणी केली, किल्ल्यांच्या

चोरवाटा व पायवाटा पाहून ठेविल्या व मावळे लोकांशीं स्नेह संपादिला. ह्या मावळे लोकांत येसाजी कंक, तानाजी मालुसरे, बाजी फसलकर असे त्याचे तीन विश्वासू लोक होते. भवानीदेवी शिवाजीला प्रसन्न झालेली आहे असें लोकांस वाटूं लागलें, व शिवाजी हळू हळू विजापुरकरांचे देश काबीज करूं लागला. हें विजापूरच्या बादशहास समजतांच बादशहाला फार राग आला.

**४ संकटः**—शिवाजीला शहाजीची आंतून फूस आहे, असें बादशहास वाटून, त्यानें शहाजीस कैद करून विजापुरास आणिलें. शिवाजीस हें समजतांच शिवाजीनें दिल्लीच्या बादशाहाशीं संधान बांधून, विजापूरकरांस तंबी देवविली; व आपल्या बापाची सुटका करविली. नंतर शिवाजीचा राज्यस्थापनेचा प्रयत्न एकसारखा चाललाच होता. पहिल्यानें त्यानें विजापूरच्या बादशहाचा मुलूख काबीज करण्याचा सपाटा चालविला. तेव्हां विजापूरच्या बादशहानें अफझुलखान नांवाचा सरदार त्यावर पाठविला. पण त्याचा त्यानें मोड केला. शिवाजीनें आपलें सैन्यही वाढविलें, व तो मोठा जोरकस बनला. नंतर दिल्लीच्या बादशहाच्या मुलखांत शिवाजी स्वाऱ्या करूं लागला. खानदेश प्रांत त्यानें आपल्या राज्यास जोडला. हें दिल्लीच्या बादशहास न आवडून त्यानें शिवाजीवर दिलीरखान व जयसिंग हे सरदार पाठविले. पण त्यांच्याशीं शिवाजीनें समेट केला. ह्या वेळीं कल्याणपासून खानदेशपर्यंत शिवाजीचें राज्य वाढलें.



**५ राज्याभिषेकः**—अशा तऱ्हेनें शिवाजीचें राज्य वाढत गेलें, तेव्हां त्यानें आपणांस मराठी राज्याचा अभिषिक्त राजा असा किताब धारण करण्याकरितां आपल्याला राज्याभिषेक करून घेतला. व सुवर्णतुला करून तें द्रव्य गोरगरीबांस व ब्राह्मणांस वांटून दिलें.

**६ राज्यव्यवस्था:**—शिवाजीनें आपल्या राज्याची योग्य व्यवस्था लावण्याकरितां अष्टप्रधान नेमले. ह्या अष्टप्रधानांकडे एक एक खातें देऊन त्यानें राज्याची नीट व्यवस्था लाविली. नोकर लोकांस जहागीर न देतां रोख पगार देण्याची पद्धत शिवाजीनें पाडली. शिवाजीच्या सैन्यांत हेटकरी व मावळे ह्या लोकांचा फार भरणा होता. तरवारी, भाले, बंदुका, तोफा, हींच त्या वेळचीं शस्त्रें होत. शिवाजीनें आरमारही तयार केलें होतें. त्यामुळें वेंगुर्ल्यापासून मुंबईपर्यंत समुद्रावर शिवाजीचाच ताबा होता.

**७ शेवट:**—शिवाजीमहाराजांनीं लहानपणापासून मराठी साम्राज्य स्थापण्याचा जो उद्योग आरंभिला त्यामुळें त्यांच्यावर अनेक संकटें आलीं. त्यामुळें त्यांस विश्रांति कधींच मिळाली नाहीं. त्यांना राज्याभिषेकानंतर गुढगी नांवाचा रोग झाला. त्यांतच त्यांचा अंत झाला. त्यांस सईबाई, सोयराबाई, राजसबाई व पुतळाबाई, अशा चार बायका होत्या. शिवाजीच्या मागून त्याचा मुलगा संभाजी गादीवर बसला.

**८ उपसंहार:**—अशा तऱ्हेनें आपल्या शिवाजीमहाराजांनीं मुसलमानी अमलांतून मराठी साम्राज्याची स्थापना केली; व त्यांनीं आपणांस गोब्राह्मणप्रतिपालक हें पद धारण केलें. ते हिंदुधर्मी होते म्हणून त्यांनीं कोणत्याही धर्माच्या लोकांचा छळ केला नाहीं. धर्मान्तर केलेल्या लोकांस त्यांनीं स्वधर्मांत परत घेतलें व त्यांच्याशीं रोटीबेटीव्यवहार केला. श्रीरामदासस्वामी व तुकाराममहाराज ह्यांचा उपदेश त्यांच्या मनावर चांगला ठसला होता. त्यांनीं आपलें राज्य मोठ्या दक्षतेनें चालविलें व म्हणून शिवाजीमहाराज लोकांस फारच प्रिय झाले. अशा त्या शिवाजीमहाराजांचा अवतार पुन्हा होवो अशी प्रार्थना करून हा निबंध पुरा करतों.

## निबंध १८ वा, तुकाराम.

**१ उपोद्घातः**—हिंदुस्थानांत जे आजपर्यंत अनेक साधुपुरुष होऊन गेले त्यांमध्यें तुकाराममहाराजांची गणना प्रामुख्यानें होते. आज महाराष्ट्रांत तुकाराममहाराज व त्यांचे अभंग हे कोणास माहीत नाहींत असा एकही मनुष्य सांपडणार नाहीं. म्हणून अशा त्या तुकाराममहाराजांचें चरित्र आपण थोडक्यांत लिहूं.

**२ बालपणः**—तुकाराममहाराजांचा जन्म देहूगांवीं शके १५३० मध्यें झाला. हा जातीचा शूद्र असून तो वाण्याचा धंदा करीत असे. परंतु लहानपणापासून ऐहिकसुखाकडे त्याची दृष्टि नव्हती. तरी त्याच्या आईबापांनीं त्याच्या लहानपणींच त्याचें लग्न केलें.

**३ उदासीपणाः**—लग्नानंतर कांहीं दिवसांनीं त्याचे आईबाप वारले, तेव्हां संसाराचा सर्व बोजा त्याजवर येऊन पडला. शिवाय तुकारामाची बायको कजाग असल्यामुळें त्याला संसारांत फारशी हौस वाटत नसे. अगोदरच संसाराचा तिटकारा असल्यामुळें व व्यापारांत तोटा येऊं लागल्यामुळें, त्याचें मन संसारांतून उडून भक्तिमार्गाकडे लागलें. इतक्यांत एक मोठा दुष्काळ पडला. तेव्हां त्याचीं गुरेंढोरें व मुलेंबाळें खाण्यास अन्न नसल्यामुळें पटापट मरण पावलीं. हें पाहून त्याचें मन उदास झालें व तो पांडुरंगाची भक्ति करूं लागला.

**४ कामगिरीः**—तुकारामानें आपल्या उपदेशानें लोकांच्या मनांत स्वधर्माभिमान उत्पन्न केला. त्याची वाणी अमृताप्रमाणें गोड असल्यामुळें त्याच्या कीर्तनाला लोकांच्या झुंडीच्याझुंडी येऊं लागल्या. शिवाजीमहाराज सुद्धां त्यांच्या उपदेशानें मोहित होऊन गेले. पण शिवाजीमहाराजांस राज्यकारभार नीट सांभाळण्याचा त्यांनीं उपदेश केला. मंबाजीसारख्या ढोंगी साधूंनीं तुकारामाचा छळ केला. त्याची

मराठी ग्रंथसंग्रहालय

अभंगरचना नदींत फेंकून दिली. त्याची अभंगरचना फार मोठी आहे.

**५ ग्रंथरचना:**—तुकारामानें केलेले अभंग सर्व महाराष्ट्रांतील लोकांच्या तोंडी आहेत. उगीच भिक्षा मागून कोणी खाऊं नये, असें त्याचें मत आहे. त्याच्या अभंगावरून तो मूर्तिपूजेचा भक्त होता असें दिसतें. तुकाराम दरवर्षी पंढरीच्या विठोबाची वारी करी. तुकारामाचे अभंग वाचीत असतां अजूनही नास्तिक लोक भक्तिमार्गाकडे वळतात. तुकारामानें आपल्या अभंगांत देवाजवळ मोक्ष न मागतां पुनर्जन्म मागितला आहे; व 'हे देवा, पुन्हा दुसऱ्या जन्मांत तुझी भक्ति करण्याची मला बुद्धि दे,' असें तो आपल्या अभंगांत म्हणत आहे. त्याच्या अभंगांची भाषा फारच सोपी आहे.

**६ चमत्कार:**—इंद्रायणींत टाकलेले अभंग न भिजणें, दगडाचें सोनें करणें, हात लावल्याबरोबर रोग बरे होणें, वगैरे चमत्कार त्यानें केल्याचें त्याच्या चरित्रांत लिहिलें आहे.

**७ शेवट:**—तुकारामाचा स्वभाव अत्यंत शांत होता. साक्रेटिसाची उपमा ह्यास शोभेल. त्याचें मरण त्यास अगोदर समजलें होतें. आपण आतां वैकुंठाला जाणार असें तो लोकांस सांगू लागला. पण लोकांस तें खरें वाटेना. विठोबानें त्याला विमान पाठविलें, व त्यांत तो बसून गेला, असें भाविक लोक म्हणतात.

**८ उपसंहार:**—तुकारामासारखे सत्पुरुष केवळ जगाच्या उद्धाराकरितां ह्या पृथ्वीवर जन्मास येतात. जेव्हां जेव्हां धर्माची ग्लानि होते, तेव्हां तेव्हां लोकांचा उद्धार करण्याकरितां परमेश्वर साधुपुरुष निर्माण करतो, किंवा, तो स्वत: साधुपुरषांचे अवतार धारण करून, लोकांना ज्ञानाचा मार्ग दाखवितो. म्हणूनच तुकाराममहाराज हे खरोखर अवतारी पुरुष होते अशी आपली समजूत आहे.

---

# निबंध १९ वा. झांशीची राणी.

**१ उपोद्घातः**—स्त्रियांच्या ठिकाणीं शौर्य, पराक्रम, राजकारण हे गुण नसतात असें पुष्कळ लोकांचें म्हणणें आहे. पुरुषांपेक्षां स्त्रियांमध्यें हे गुण कमी प्रमाणानें असतात हें जरी खरें आहे, तरी पण, अहिल्याबाई होळकरीण, झांशीची राणी, ह्या स्त्रियांच्या चरित्रांवरून स्त्रियांच्या ठिकाणीं हे गुण मुळींच नसतात असें मात्र नाहीं. १८५७ सालच्या बंडामध्यें ज्या झांशीच्या राणीनें सर्व जगाला थक्क करून सोडलें व स्त्रीजातीची कीर्ति अजरामर करून ठेविली त्या राणीचें आतां आपण वर्णन करूं.

**२ बालपणः**—ह्या राणीचें माहेरचें नांव मनुबाई. ही मोरोपंत तांब्यांची मुलगी. मोरोपंत तांबे ब्रह्मावर्तास दुसऱ्या बाजीरावांच्या घरीं नोकरीस होते. मनुबाईची आई अगदीं लहानपणींच वारली होती. तेव्हां बाजीरावांच्या घरींच तिचें सर्व बालपण गेलें. बाजीरावांस तीन दत्तक मुलगे होते. त्यांच्याबरोबर मनुबाईस सर्व प्रकारचें मर्दानी शिक्षण मिळाल्यामुळें ती फार धीट झाली होती.

**३ लग्नः**—नंतर ती आठ नऊ वर्षांची झाल्यावर बाजीरावांच्या सल्यानें मोरोपंतांनीं झांशी संस्थानच्या गादीचे मालक गंगाधरराव नेवाळकर ह्यांच्याबरोबर मनुबाईचें लग्न लावून दिलें. गंगाधररावांची ही दुसरी बायको होती. पहिली बायको नुकतीच वारली होती. तेव्हां मोरोपंत तांबेही आपल्या मुलीबरोबर झांशीस गेले. तेव्हां मोरोपंतांस गंगाधररावांनीं सरदारकी देऊन ह्या नव्या सासऱ्याचा मान राखिला. मोरोपंतांसही आपल्या मुलीशिवाय दुसरा आधार नव्हता. मनुबाईचें सासरचें नांव लक्ष्मीबाई असें ठेवण्यांत आलें. ही लक्ष्मी आल्यादिवसापासून संस्थानची भरभराटच होत गेली

**४ भयंकर प्रसंगः**—लग्न झाल्यानंतर सातआठ वर्षें चांगलीं गेलीं. नंतर लक्ष्मीबाईंना एक मुलगा झाला. पण तो तीन महिन्यांचा होऊन वारला. त्यामुळें गंगाधररावांस फार वाईट वाटलें. त्यांस ताप येऊं लागला, व त्या तापांतच त्यांचा अंत झाला. अशा तऱ्हेनें ह्या १५-१६ वर्षांच्या राणीसाहेबांवर भयंकर प्रसंग येऊन ठेपला ! त्यांस मुलगा नसल्यामुळें गंगाधररावांनीं मरतांना दत्तक मुलगा घेतला होता. पण इंग्रजसरकारानें हा दत्तक मान्य न केल्यामुळें त्यांचें संस्थान खालसा झालें. इतक्यांत भयंकर बंड उत्पन्न झालें. ह्या बंडामुळें राणीसाहेब व इंग्रज ह्यांचें वितुष्ट आलें.

**५ शेवटः**—राणीसाहेब अगोदर राजनिष्ठ होत्या. पण राणीसाहेब ह्या बंडवाल्यांस सामील आहेत अशी इंग्रजांची समजूत झाली होती. शेवटीं रागावून लक्ष्मीबाईसाहेबांनीं इंग्रजांविरुद्ध शस्त्र उपसलें, व शेकडो इंग्रज लोकांस कापून काढलें. शेवटीं त्या पळत असतां इंग्रज सैन्याचे वार लागून ग्वाल्हेरजवळ मरण पावल्या. त्यांच्या दत्तक मुलाचें नांव दामोदरराव असें होतें. ह्या दामोदररावांचे चिरंजीव लक्ष्मणराव हे हल्लीं इंदुरास आहेत.

**६ उपसंहारः**—अशा तऱ्हेनें सर्व स्त्रीजातीला अभिमान उत्पन्न करणारी राणी आमच्या हिंदुस्थान देशांत उत्पन्न झाल्यामुळें आम्हां हिंदुलोकांना अभिमान तर वाटतोच वाटतो, पण युरोपियन लोकांसही तिच्या अंगच्या शौर्याचें कौतुक वाटतें.

## निबंध २० वा, गृहशिक्षण.

**१ उपोद्घातः**—शाळांमधून लिहिणें, वाचणें, इतिहास, भूगोल, गणित वगैरे विषयांचें शिक्षण दिलें जातें. परंतु एवढ्याच शिक्षणानें

मनुष्याचा आयुष्यक्रम नीटपणें पार पडणार नाहीं. घरामध्यें स्वच्छता ठेवणें, टापटिपीनें वागणें, घरांतील लहान थोर माणसांशीं मिळून मिसळून वागणें, वडील माणसांना योग्य तो मान देणें, पाळलेल्या जनावरांची योग्य काळजी घेणें, लोकांच्या उपयोगीं पडणें, वगैरे अनेक गोष्टींचें शिक्षण नुसत्या शाळांतून मिळणें शक्य नाहीं. तें घरच्या घरींच आईबापांनीं मुलांमुलींस दिलें पाहिजे. हें जें आई-बापांनीं अगर वडील माणसांनीं घरीं द्यावयाचें शिक्षण त्यास गृह-शिक्षण असें म्हणतात. त्याचा आपण विचार करूं.

२ **विवेचनः**—गृहशिक्षण हें मुलींसच द्यावयाचें असतें व मुलांस कांहीं त्याची जरूरी नाहीं असें जर कोणास वाटत असेल तर ती चूक आहे. गृहशिक्षण हें मुलांस व मुलींस दोहोंसही दिलें पाहिजे. गृहशिक्षणामध्यें ज्या ज्या गोष्टी शिकवावयाच्या असतात, त्या घरच्या घरींच प्रसंग पाहून शिकवावयाच्या असतात; व तसे प्रसंग घरीं जितके जास्त येतात तितके शाळेंत येत नाहींत. म्हणून गृहशिक्षण हें शाळेंत देतां येणें शक्य नाहीं. घर ही एक प्रकारची शाळाच समजून, आईबापांनीं वर सांगितलेलें गृहशिक्षण घरींच द्यावें हें उत्तम.

३ **शाळेंतील अडचणीः**—आतां कोणी असें म्हणतील कीं, शाळेंत गृहशिक्षण कां देऊं नये? तर त्यास उत्तर असें कीं, सारवणें, झाडणें, कपडे धुणें, स्वयंपाक करणें, जनावरांना पाणी पाजणें व त्यांना वैरण घालणें, हीं घरचीं कामें शाळेंत कशीं करून घ्याव-याचीं? शाळेला जर बोर्डिंग असेल व त्या बोर्डिंगमध्यें जर मुलें ठेवण्याची पालकांची तयारी असेल तर हें गृहशिक्षण त्या बोर्डिंग-मध्यें मात्र मिळूं शकेल; पण बोर्डिंगाचा खर्च देऊन फारच थोडे पालक आपलीं मुलें बोर्डिंगमध्यें ठेवणार. अर्थात अशा बोर्डिंगांचा

फायदा सर्व पालकांना मिळणार नाहीं. म्हणून पालकांनीं घरच्या घरींच हें गृहशिक्षण देणें योग्य आहे.

**४ भेद:**—आतां कांहीं मर्यादेच्या पलीकडे मुलामुलींच्या गृह-शिक्षणांत थोडासा फरक असूं शकेल. उदाहरणार्थ, मुलींना शिशु-संगोपन, शिवण, स्वयंपाक ह्यांचें शिक्षण अवश्य दिलें पाहिजे. मुलांना ह्या शिक्षणाची मुलींइतकी जरूरी नाहीं.

**५ उपसंहार:**—एकंदर विवेचनावरून शाळेंतील शिक्षण आणि गृहशिक्षण ह्यांत कोणता फरक आहे तें सहज समजून येईल. गृह-शिक्षण जर नसेल तर शाळेंतील नुसत्या पुस्तकी ज्ञानाचा कांहीं-एक उपयोग होणार नाहीं. गृहशिक्षणानें संसार सुखमय करतां येतो. शाळेंतील शिक्षण हें गृहशिक्षणाला मदत म्हणून दिलें जातें. शेतकरी व त्याची बायको घरच्या शिक्षणानें आनंदांत राहूं शक-तात. पण सुशिक्षित नवराबायको गृहशिक्षणाच्या अभावीं दु:खें भोगतात. अशी स्थिति न यावी म्हणून वडील माणसांनीं आपल्या मुलांमुलींस गृहशिक्षण अवश्य द्यावें.

---

## निबंध २१ वा, स्त्रीशिक्षण.

**१ उपोद्घात:**—ज्याप्रमाणें पुरुषवर्गाला शिक्षणाची जरूरी आहे, त्याचप्रमाणें स्त्रियांनाही शिक्षणाची जरूरी आहे. म्हणून स्त्रियांना जर शिक्षण द्यावयाचें असेल तर तें कशा प्रकारचें असावें व कोणतें शिक्षण दिलें असतां त्या उत्तम गृहिणी होतील ह्याचा आपण विचार करूं.

२ विरोधः—कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे, कीं 'पुरुषांना फक्त काय ती शिक्षणाची जरूरी आहे, स्त्रियांना शिक्षणाची जरूरी नाहीं. त्यांना काय नोकरी थोडीच करावयाची आहे ? त्यांना प्रपंच करतां येऊं लागला म्हणजे झालें; व तें ज्ञान घरच्या घरीं त्यांना सहज मिळूं शकेल. त्याकरितां त्यांना शाळेंत घालण्याचें कांहींच कारण नाहीं. शिवाय मुली शाळेंत गेल्या म्हणजे चटोर होतात व त्यांस घरकामाचा कंटाळा येतो. ह्याकरितां मुलींस शाळेंत घालूं नये.' असा कांहीं लोकांचा स्त्रीशिक्षणासंबंधीं समज झालेला आहे.

३ उत्तरः—स्त्रियांना नोकरी करण्याची जरूरी नाहीं असें नाहीं. केवळ स्त्रियांच्या उपयोगाचीं जीं खातीं आहेत, उदाहरणार्थ लहान मुलामुलींचें शिक्षण, सुईणीचें शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, अशा तऱ्हेचें शिक्षण लोकांना देण्याइतकें तरी कांहीं स्त्रियांनीं शिक्षण घेतलेंच पाहिजे. आतां बाकीच्या स्त्रियांना जरी नोकरी करावयाची नसली तरी त्यांना उत्तम रितीनें प्रपंच चालवून आपल्या मुला-बाळांची जोपासना, घरगुती जमाखर्च, हिशेब ठिशेब, ह्या गोष्टी जर त्यांस करतां आल्या, तर प्रपंच सुखकर होईल कीं प्रपंचाची हानि होईल ? आणि ह्या गोष्टी जर स्त्रियांस यावयास पाहिजेत, तर त्यांस लिहितां वाचतां येणें, हिशेब व जमाखर्च करतां येणें, ह्या गोष्टी जरूर शिकविल्या पाहिजेत. अर्थात् ह्या गोष्टी शिक-विण्याकरितां त्यांस शाळेंतच घातलें पाहिजे. घरच्याघरीं शिकवूं म्हटलें तर पालकांकडून तसें होत नाहीं. दुसरी गोष्ट, असे कांहीं विषय असतात कीं, ते घरच्याघरीं कधींच शिकवून व्हावयाचे नाहींत. आरोग्यशास्त्र, रुग्णपरिचर्या, औषधोपचार, जमाखर्च, थोडें गणित, इतिहासभूगोल, हे विषय शिक्षकालासुद्धां आपल्या मुलींना शिक-विण्यास फुरसत मिळत नाहीं; मग इतरांची काय कथा ? अर्थात्

मुलींना कांहीं मर्यादेपर्यंत शाळेंत पाठवून शिक्षण दिलेंच पाहिजे. मुली चटोर होतात हा जो आक्षेप आहे तो पालकांनींच सोडवावा. नीटनेटकेपणा म्हणजेच चटोरपणा अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. मुलींनींही साधेपणा ठेवावा.

४ **भेदः**—मुलांमुलींच्या प्राथमिक शिक्षणांत फारसा मत-भेदाचा प्रश्न येत नाहीं. ज्या मुलींना लग्नें करून संसार करावयाचा असतो, त्यांस देशी भाषेंतील वर्तमानपत्रांतील मजकूर चांगल्या तऱ्हेनें समजेल इतकें शिक्षण दिलेंच पाहिजे. ह्याशिवाय गृहशिक्षण, शिशुसंगोपनाचे नियम, आरोग्य, ह्या विषयांचेंही शिक्षण दिलें पाहिजे. अशा तऱ्हेनें मुलांमुलींच्या शिक्षणांत थोडासा फरक करावा लागेल. ज्या स्त्रियांना ज्ञानाकरितां शिकावयाचें असेल व तें ज्ञान लोकांना शिकविण्याची इच्छा असेल त्यांच्या शिक्षणांत, पुरुषांचें व स्त्रियांचें, असा भेद करतां येतच नाहीं.

५ **फायदेः**—अशा तऱ्हेनें स्त्रियांना शिक्षण दिलें असतां तें निरुपयोगी होईल असें मुळींच नाहीं. उलट अशा स्त्रिया उत्तम नागरिक बनून आपला संसार उत्तम तऱ्हेनें चालवूं शकतील. ज्या स्त्रियांना आपल्या पोटापाण्याची काळजी स्वतःलाच बाळ-गावी लागते, त्यांस सुइणीचें शिक्षण, वैद्यकी, विणकाम असे धंदे शिकविले असतां त्यांना उपाशीं मरण्याची पाळी येणार नाहीं.

६ **उपसंहारः**—असो. अशा तऱ्हेनें स्त्रीशिक्षण हवें कीं नको, हवें असल्यास तें कोणत्या तऱ्हेचें हवें, लोकांचे आक्षेप काय, व त्यांस उत्तरें कोणतीं, ह्याप्रमाणें या लहानशा निबंधांत विवेचन केलें आहे. तरी ह्यापुढें स्त्रियांच्या शिक्षणासंबंधीं लोकांनीं हयगय करूं नये असें आमचें मत आहे.

# निबंध २२ वा, माझें आवडतें झाड.

१ **उपोद्घातः**—परमेश्वरानें नाना प्रकारचीं झाडें उत्पन्न केलीं आहेत. त्यांत कोणाला आंब्यांचें झाड आवडतें, कोणाला डाळिंबाचें झाड आवडतें, कोणाला केळ आवडते, तर पुष्कळांना गुलाब आवडतो. हे आवडीचे प्रकार त्या त्या झाडाच्या गुणामुळेंच उत्पन्न झाले आहेत. प्रत्येकाची आवड वेगवेगळी असल्यामुळें सर्वांना सर्वच झाडें आवडतात असा प्रकार नाहीं. मला विशेष आंब्याचें झाड आवडतें.

२ **कारणः**—आंब्याच्या झाडापासून मनुष्याला घेण्यासारखा कांहींतरी गुण आहे. तो गुण म्हणजे आंब्याच्या ठिकाणीं परोपकारीपणा हा गुण विशेष आहे. त्याशिवाय ह्या झाडापासून आपणांस सावली मिळते. बागेमध्यें हें झाड असलें तर सर्व बागेला शोभा येते. त्याचीं फळें पिकलीं म्हणजे तीं खाऊन मनुष्याची भूक भागते. कच्चीं फळेंहि मनुष्याच्या फार उपयोगाचीं आहेत. त्याचीं पानें लग्नकार्यांत मंगलकारक समजतात. त्याच्या फुलांना मोहोर म्हणतात. हा मोहोर देवाला वहातात. कोणताही नवीन पदार्थ आपल्या शेतांत पिकला म्हणजे तो देवाला देण्याची आपल्या हिंदु लोकांत पद्धत आहे. आंबा मोहोरला म्हणजे त्याच्या बारीक कैऱ्या लोक खाऊं लागतात. त्या कैऱ्या लोकांनीं खाण्याच्या अगोदरच हा मोहोर देवाला वहाण्याची पद्धत पडली असावी. अशा तऱ्हेनें आंबा हा सर्व मनुष्यांच्या उपयोगीं पडतो. त्याला लोक दगड मारतात, कावळे वर बसून मलमूत्र विसर्जन करतात, इतकेंच काय पण मेलेल्या मनुष्याला जाळण्याकरितां ओला आंबा तोडतात! तो कुऱ्हाडीचे घाव सहन करतो आणि आपलीं फळें लोकांना खावयास देतो. पण तो

कधींही तक्रार करीत नाहीं. कधीं रागवत नाहीं, कधीं रुसत नाहीं. त्याला मारा-झोडा-तोडा, तो साधुपुरुषाप्रमाणें सर्व दुःखें लोकांकरितां सहन करितो. आणि म्हणूनच हा आंबा मला आवडतो.

**३ झाडाचे भागः**—मूळ, खोड, पानें, फुलें, फळें, असे ह्या झाडाचे पांच भाग आहेत. मुळें जमिनींतून अन्नरस शोषण करितात. खोडाचें काम पानाफुलांना व फळांना अन्नरस पोंचविण्याचें असतें. पानांचें काम हवा व प्रकाश घेऊन झाडाची वाढ करण्याचें असतें. फुलांत पुंकेसर व स्त्रीकेसर असतात. ते एकत्र होऊन फलधारणा होते. फळांचें काम पुन्हां झाडाची उत्पत्ति करण्याचें आहे. अशा तऱ्हेनें ह्या पांच भागांचें काम व्यवस्थित चाललेलें असतें. प्रत्येक झाडाचे असे पांच भाग असतात. माघामध्यें ह्या झाडांना मोहोर येतो. ह्या वेळीं कैऱ्या अगदीं मोहोरीएवढ्या असतात. त्या फुलांमध्यें असतात. त्या सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिल्या असतां दिसतात. चार महिन्यांनीं फळांची वाढ पूर्ण होते.

**४ उपयोगः**—पिकलेले आंबे खातात. त्यांचा गुळांबा तयार करतात. त्यांचें लोणचें घालतात. आंब्यांचा रस काढतात. यंत्राच्या साहाय्यानें हा रस ७-८ महिने टिकवितां येतो. आंब्यामध्यें गोड व आंबट असे दोन प्रकार आहेत. हापूस, पायरी, फरनांडीस, मलगोबा मद्रासी, वगैरे आंबे फार गोड असतात. माळी लोक आंब्याचीं कलमें करितात.

**५ उपसंहारः**—अशा तऱ्हेनें माझ्या आवडत्या झाडाचीं कारणें देऊन त्याचें थोडक्यांत वर्णन केलें आहे. मनुष्यप्राण्यानें आंब्याचा उपयोग लक्षांत घेऊन त्याप्रमाणें तन मन धन यांचा उपयोग लोकांचें सुख वाढविण्याकडे केला तर फार चांगलें होईल.

---

# निबंध २३ वा, स्वदेशाभिमान.

१ **उपोद्घातः**—आपल्या देशाबद्दल प्रेम बाळगून त्या देशाच्या उन्नतीचे प्रयत्न करणें ह्यालाच देशाभिमान म्हणतात. ही उन्नति लेखनानें अगर नवे नवे शोध लावून अगर देशाचा व्यापार वाढवून अगर प्रसंगीं शौर्य गाजवून, अशा अनेक प्रकारांनीं करितां येतें. ह्याबद्दल आतां आपण विचार करूं.

२ **वेडी समजूतः**—कांहीं लोकांची अशी वेडी समजूत असते कीं, शौर्य गाजविल्याशिवाय तो मनुष्य देशाभिमानी होऊंच शकत नाहीं. पण ही त्यांची समजूत अगदींच चुकीची आहे. नेहेमींच शौर्य गाजविण्याचे प्रसंग असतात असें नाहीं. आणि सर्वांसच शौर्य गाजवितां येतें असेंही पण नाहीं. म्हणून प्रत्येक मनुष्यानें अंगीकारलेल्या धंद्यांत प्राविण्य मिळवून, आपली कृति आपल्या देशाच्या जर उपयोगीं पडूं दिली,तर त्या मनुष्यास देशाभिमानी असेंच म्हणतां येईल. त्याचीं उदाहरणें पुढें देतों.

३ **ग्रंथरचनाः**—ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास,मोरोपंत वगैरे जे साधु होऊन गेले, त्यांनीं आपल्या देशी भाषेमध्यें ग्रंथरचना केली. त्यामुळें लाखों लोकांस ते ग्रंथ वाचावयास मिळून ज्ञानमार्गाचा दरवाजा खुला झाला. त्याचप्रमाणें ज्या ज्या ग्रंथकारांनीं परभाषेंतील उत्तम ग्रंथांचीं भाषांतरें केलीं व शास्त्रीय ज्ञानांत भर घातली, त्यांसही स्वदेशाभिमानीच म्हटलें पाहिजे.

४ **नवे शोधः**—नवे नवे शोधक लोक निर्माण झाले म्हणजे मनुष्याच्या सुखसोयींमध्यें पुष्कळ सुधारणा होते. ह्याचीं उदाहरणें म्हटलीं म्हणजे गिरण्या, तारायंत्र, आगगाड्या, आगबोटी, विमानें, चित्रपट, फोटो काढणें, वगैरे सुधारणा होत. हे शोध ज्या लोकांनीं

लावले त्यांनीं आपल्या देशाच्या कीर्तींत भर घातली असेंच म्हणावें लागतें. हा मान हिंदी लोकांना मिळवितां आला नाहीं म्हणूनच हिंदी लोक जगाच्या मागें राहिले आहेत.

५ **व्यापारः**—जे लोक निरनिराळे कारखाने काढून निरनिराळ्या मालाची निपज करतात व आपल्या देशाच्या लोकांच्या गरजा भागवून परदेशांत माल पाठवितात आणि तेथला पैसा आपल्या देशांत आणतात व आपल्या देशाची संपत्ति बाहेर जाऊं न देतां उलट परदेशांतील संपत्ति आपल्या देशांत आणतात अशा ह्या व्यापारी लोकांस स्वदेशाभिमानीच म्हटलें पाहिजे. इंग्रज कारखानदारांस इंग्रज लोक देशाभिमानी म्हणतात, त्याचप्रमाणें हिंदी कारखानदारांस हिंदी लोक देशाभिमानी असेंच म्हणतात व तें योग्यच आहे.

६ **शौर्यः**—लढाईचा प्रसंग आला असतां त्या त्या देशाच्या संरक्षणार्थ शौर्य गाजविणें हें प्रत्येकाचें काम आहे. फ्रेंच लोकही तेंच करतात, इंग्रज लोकही तेंच करतात, हिंदू लोकांनींही पूर्वी तेंच केलें आहे. पण प्रसंग पाहूनच शौर्य गाजवावयाचें असतें. गुलामगिरींतल्या राष्ट्रांना स्वातंत्र्याकरितां शौर्य गाजविण्याचा प्रसंग नेहेमीं येतो.

७ **उपसंहारः**—एथपर्यंत देशाभिमान म्हणजे काय व लोकांच्या समजुती काय आहेत, खरा देशाभिमान कशांत आहे हें सांगितलें. वडिलांची आज्ञा पाळणें, शिस्तीनें वागणें, दुसऱ्यांना योग्य मान देणें, पाप न करणें, कुटुंब, समाज, देश, ह्यांचा विचार क्रमानें करणें ह्या गोष्टीही स्वदेशाभिमानांतच येतात हें विसरूं नये.

सं. ता.

## निबंध २४ वा, ग्रंथसंग्रहालय.

१ **उपोद्घातः**—ज्या ठिकाणीं निरनिराळ्या विषयांवरचीं उपयुक्त पुस्तकें वाचावयास मिळण्याची सोय केलेली असते त्यास ग्रंथसंग्रहालय असें म्हणतात. अशीं ग्रंथसंग्रहालयें जिल्ह्याच्या ठिकाणीं, मोठ्या तालुक्याच्या ठिकाणीं, व शाळांमध्येंही असतात. त्याबद्दल आपण आतां विचार करूं.

२ **प्रकारः**—जगांतील निरनिराळ्या शास्त्रांची इतकी प्रगति झाली आहे कीं, त्या त्या विषयावर शेंकडों नव्हे तर हजारों पुस्तकें छापून तयार झालीं आहेत. वैद्यकी, शेतकी, इतिहास, भूगोल, गणित, ज्योतिष, धर्म, नौकानयन, विमान, आगगाडी, विद्युत, युद्ध-कला वगैरे सर्व विषयांवर शेंकडों ग्रंथ झाले आहेत. अर्थात् त्या त्या प्रत्येक विषयाचें निरनिराळें ग्रंथालयही होऊं शकेल, व तें तसें झालें असतां त्या त्या विषयाचा अभ्यास करणाऱ्या इसमास त्या ठिकांणीं भरपूर माहितीही मिळूं शकेल.

३ **फायदेः**—समाजांतील साधारण श्रीमंत लोक जरी घेतले तरी त्यांस एवढी ग्रंथसंपत्ति खरेदी करणें शक्य नसतें. मग गरीबांची कथा काय? अशा लोकांस ज्ञान मिळविण्याचा मार्ग म्हणजे हीं ग्रंथालयेंच होत. अभ्यासी लोक ह्या ग्रंथालयांचा उपयोग करून घेतात. सामान्य लोकांसही करमणुकीकरितां ह्या ग्रंथालयांचा उपयोग होतो.

४ **फिरतीं ग्रंथसंग्रहालयेंः**—खेडेगांवांतून अगर ज्या ठिकाणीं ग्रंथसंग्रहालयें नाहींत त्या ठिकाणच्या लोकांत ग्रंथवाचनाची गोडी उत्पन्न करण्याकरितां फिरतीं वाचनालयें ठेवलेलीं असतात. हें

वाचनालय पंधरा दिवस अगर एक महिना त्या त्या गांवांत रहातें. मग पुढच्या गांवाला जातें. अशा तऱ्हेनें लोकांच्या ठिकाणीं वाचनाची गोडी उत्पन्न करण्याचा मार्ग बडोदें संस्थानांत चालू आहे.

**५ आपल्या देशाची स्थितिः**—सुधारलेलीं जीं राष्ट्रें आहेत त्यांत वर सांगितल्याप्रमाणें ग्रंथसंग्रहालयांची स्थिति चांगली सुधारलेली आहे व तेथील लोक हौसेनें त्यांचा फायदा घेतात. पण आपल्या हिंदुस्थानांत अशीं ग्रंथसंग्रहालयें फारशीं नाहींत व आपल्या देशी भाषेंत तर ग्रंथरचना फारच थोडी झालेली आहे. त्यामुळें सर्व शास्त्रांवरचीं पुस्तकेंच मिळण्यासारखीं नाहींत. मग ग्रंथसंग्रहालयांत तरी तीं कोठून असणार?

**६ उपसंहारः**—पण अशी जरी स्थिति आहे तरी ग्रंथकार लोकांनीं मनावर घेतल्यास व त्यांस धनिक लोकांनीं आश्रय दिल्यास, नवी ग्रंथरचना होऊं शकेल. तोपर्यंत आहेत त्याच ग्रंथसंग्रहाललयांचा लोकांनीं उपयोग करून घ्यावा. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, विद्यार्थी लोक अगर सामान्य लोक ह्या असलेल्या ग्रंथसंग्रहायांचाहि उपयोग करून घेत नाहींत. निदान तसें तरी त्यांनीं करूं नये ही माझी त्यांस विनंति आहे.

---

# निबंध २५ वा. पानिपतची लढाई.

**१ उपोद्घातः**—ज्या ठिकाणीं कौरवपांडवांनीं युद्ध केलें, त्याच ठिकाणीं म्हणजे पानिपत येथें १७६१ मध्यें मराठे आणि अफगाण ह्यांच्यामध्यें फार मोठें युद्ध होऊन लाखों मराठे वीर ह्या लढाईंत मेले आणि मराठी साम्राज्याच्या इमारतीला जबर धक्का बसला. अशा त्या युद्धाचें आतां आपण वर्णन करूं.

**२ कारणः**—औरंगजेब वारल्यावर दिल्लीचे बादशहा नामधारी बनले होते, अर्थात् बाजीरावानें व नानासाहेबानें दिल्लीस हिंदुपद-पातशाही स्थापण्याचा घांट घालून त्या दिशेनें प्रयत्न आरंभिले. नानासाहेब पेशव्यांनीं दिल्लीच्या बादशहाचें रक्षण करण्याचें काम आपल्या हातीं घेतांच नजीबखान रोहिल्यानें काबूलचा राजा अह-मदशहा अबदाली ह्यास मदतीला बोलावून बादशाहीचें रक्षण कर-ण्याचें काम आपल्याकडे घेतलें. ह्यामुळें मराठे आणि मुसलमान असे दोन तट पडून लढाईला आरंभ झाला.

**३ चूकः**—नजीबखान रोहिल्यानें अहमदशहा अबदालीस मदतीला बोलाविलें त्या वेळीं, अहमदशहा पंजाबांतून येत असतां सर्व मराठ्यांनीं त्यास जितका अटकाव करावयास पाहिजे होता तितका केला नाहीं. शिंद्यांच्या मदतीला होळकर, बुंदेले हे जर गेले असते तर पंजाबांतच अहमदशहा अबदालीचा पराभव झाला असता. अहमदशहा, नजीबखान,सुजा, ह्यांच्या सैन्यास एकत्र होण्याची संधी मराठ्यांनीं दिली. ह्या सैन्याची रसद मराठ्यांकडून बंद झाली नाहीं. उलट मराठ्यांची रसद मुसलमानांनीं बंद केली. ह्यामुळें मराठ्यांची स्थिति फारच वाईट होत चालली.

**४ लढाईः**—अहमदशहा अबदाली आपण होऊन लढाईला सुरवात करीना. मराठ्यांना उपासमारीनें जेर करण्याचा त्याचा विचार होता. पण मराठ्यांना लवकर लढाई आटोपून टाकावयाची होती, म्हणून ता. १४ जानेवारी १७६१ रोजीं सकाळींच मरा-ठ्यांनीं लढाईस सुरवात केली. भाऊसाहेब, विश्वासराव, शिंदे, होळ-कर, गायकवाड, बुंदेले वगैरे सर्व सरदार मराठ्यांच्या बाजूला होते. पहिल्या प्रथम मराठ्यांचा जय झाला खरा, पण मराठ्यांचे सेनापति विश्वासराव, भाऊसाहेब, शिंदे, बुंदेले, मेहेंदळे हे पटापट मारले गेले.

धीर देणारा असा सेनापति मागें शिल्लक राहिला नाहीं. त्यामुळें मराठी फौज ऐन वेळीं उधळून पळूं लागली, व कांहीं लोक अबदालीनें कापून काढले. ह्याप्रमाणें या लढाईंत मराठ्यांचा पराभव झाला.

५ **उपसंहारः**—मागें ज्या चुका सांगितल्या त्या मराठ्यांच्या हातून झाल्या नसत्या व सर्व सेनेचा सेनापति भाऊसाहेब जर गर्दींत न घुसतां मागें राहून सैन्याला शिस्त लाविता, तर ह्या लढाईंत मराठ्यांचाच जय झाला असता मुसलमानांचा जय होऊनही त्या पक्षास कांहींच फायदा झाला नाहीं. कारण अहमशहा अबदाली दिल्लींतून परत काबुलास गेल्यावर दिल्लीच्या बादशाहींत बखेडे माजून शेवटीं बादशाही नामशेष झाली ती झालीच !

# पत्रें.

## पत्र नं. १, मुलाकडून बापास.

पुणें, शनिवार पेठ ४९९ श्री ता. ५-४-३३

तीर्थरूप राजमान्य राजश्री बाबा, मुक्काम सातारा,

वडिलांचे सेवेसी:—

बालकें वसंत मुक्काम पुणें याचा शिरसाष्टांग नमस्कार,

विज्ञापना:—

आपल्या आशीर्वादानें आम्ही सर्व मंडळी खुशाल आहोंत. माझी वार्षिक परीक्षा उद्यांपासून सुरू होईल. माझा अभ्यास चांगला झाला आहे. यमीची परीक्षा पंधरा दिवसांनीं होणार आहे. ती झाली म्हणजे मेमध्यें आम्ही आपणांस भेटावयास येणार आहोंत. आईची प्रकृति बरी नाहीं असें आपल्या पत्रांत होतें, त्यामुळें काळजी वाटत आहे. दादा मुंबईहून पुण्यास येईल व त्याच्याबरोबर आम्ही येऊं. यमीला बोर्डिंगांतलें जेवण आवडत नाहीं अशी तिची तक्रार आहे. आईच्या प्रकृतीबद्दल ताबडतोब पत्र पाठविणें. तीर्थरूप मातोश्रीस सप्रेम सा. नमस्कार. बापूस आशीर्वाद.

कळावें ही विज्ञापना. आपला,

**वसंत गोविंद करमरकर.**

पत्ता:—

तीर्थरूप रा. रा.

**गोविंद गणेश करमरकर**

मंगळवार पेठ ३४५

**सातारा**

## पत्र नं. २, बापाकडून मुलास.

सातारा मंगळवार पेठ ३४५ श्री ता. १५-४-३३

चिरंजीव वसंत मुक्काम पुणें ह्यासी—

गोविंद गणेश करमरकर मुक्काम सातारा
यांचा अनेक आशीर्वाद.

तुझें पत्र पोंचलें. तुझी परीक्षा झाली म्हणजे पेपर कसे गेले तें ताबडतोब कळीव. यमीला म्हणावें नीट अभ्यास कर. यमीला आज वेगळें पत्र पाठविलें आहे. बोर्डिंगांतलें जेवण आवडत नाहीं, ही यमीची तक्रार बरोबर नाहीं. इतर मुलींबरोबरच तिला बोर्डिंगांत वागलें पाहिजे. दादा मुंबईहून पुण्यास येईल त्याच्याबरोबर मेच्या सुटींत तुम्ही दोघें साताऱ्यास या. यमीच्या लेडी सुपरिंटेंडेंटना मी आज पत्र लिहिलें आहे. सौभाग्यवतीची प्रकृति आतां बरी आहे. बापूही चांगला खेळत आहे.

कळावें हे आशीर्वाद.

**गोविंद गणेश करमरकर.**

पत्ता—

चिरंजीव राजश्री
**वसंत गोविंद करमरकर**
सदाशीव पेठ ४९९
**पुणें शहर.**

## पत्र नं. ३, मित्राचें मित्रास.

जुनी सांगली ३४८ श्री ता. १-९-३३

मित्रवर्य रा. रा. वामन गणेश देशपांडे मु॥ पुणें यांसी—

गणेश गोपाळ अत्रे मुा सांगली

यांचा कृ. सा. न. वि. वि.

तुझ्याकडून बरेच दिवसांत पत्र नाहीं. तरी कृपा करून आपली खुशाली कळविणें. आपल्या शाळेचें ग्यादरिंग कधीं आहे तें कळविणें, म्हणजे त्या वेळीं मी पुण्यास येईन. येतांना सांगलीहून तुझ्याकरितां पाणी पिण्याचें एक सुंदर भांडें घेऊन येणार आहे. माझी प्रकृति आतां सुधारत आहे. सर्व शिक्षकांस व मित्रमंडळीस माझा नमस्कार सांगावा.

कृ. लो. अ. हे विनंति

आपला

**गणेश गोपाळ अत्रे**

पत्ता—

मित्रवर्य रा. रा.

**वामन गणेश देशपांडे**

इयत्ता ४ ब, न्यू इंग्लिश स्कूल

**पुणें शहर,**

## पत्र नं. ४, मुलीचें बापास.

नाशीक, रविवार पेठ ८७७ श्री ता. १५-८-३३

तीर्थरूप रा. रा. बाबा मुक्काम मुंबई

वडीलांचे सेवेसीं

बालके यमूचा शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना.

आपल्या आशीर्वादानें आम्ही सर्व मंडळी खुशाल आहोंत. दादा परवां नगरास गेला. त्यास तेथें काकांनीं बोलाविलें होतें. माझा व शंकरचा अभ्यास बरा चालला आहे. आईची प्रकृति बरी आहे. बाळ रांगूं लागला. इकडे आतां पाऊस कमी होऊं लागला. रोगराई वगैरे कांहीं नाहीं. सवड झाली म्हणजे आपण एकदां नाशिकास येऊन जाणें. येतांना मला एक जरीकांठी खण व बाळाला लोंकरीचें झबलें व पायमोजे व जरीची टोपी आणावयास विसरूं नये.

कळावें हे विज्ञापना.

आपली

**यमू**

पत्ता--

तीर्थरूप रा. रा.

**गोविंद गणेश करमरकर**

फणसवाडी, चाळ नं ३

**मुंबई.**

## पत्र नं. ५, मैत्रिणीचें मैत्रिणीस.

पुणें शनिवार पेठ ४५० श्री ता. १०-११-३३.

प्रिय सौभाग्यवती शांताबाई देवधर मुक्काम नाशीक ह्यांसः—

कमलाबाईचा कृ. शिरसाष्टांग नमस्कार विनंति विशेषः—

तूं पुण्याहून गेल्यापासून तुझी माझी पुन्हा भेट झाली नाहीं. तूं आतां पुण्यास माहेरीं कधीं येणार ? नारायणरावांची वकीलीची परीक्षा पास झाली असें ज्ञानप्रकाशांत वाचलें. आनंद झाला. आतां तूं वकिलीणबाई होणार; मग आम्हांला तूं विसरणार कीं काय ? नारायराव व तूं नाताळांत पुण्यास या. पुण्यास आल्यानर जोडप्यानें आमच्याकडे येण्यास विसरूं नका. आम्ही सर्व मंडळी खुशाल आहोंत. राधाकाकूंच्या घरची सर्व मंडळी बरी आहेत. परमेश्वर करो, व लवकरच तुला मुलगा होवो, म्हणजे तुझ्या सासूबाईंना दुप्पट आनंद झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

कळावें हें विनंती.

आपली

**कमलाबाई देशमूख**

पत्ता—

श्रीमती सौभाग्यवती

**शांताबाई नारायण देवधर**

डिेश्वर ३४५

**नाशीक.**

REFBK-0005040

समाप्त

१०४०